
रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १३
www.ramprahar.com
रविवार, ३० जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## वरंध घाटात कार कोसळून तिघांना जलसमाधी



**पुणे :** वरंध घाट मार्गात शनिवारी (दि. २९) भीषण अपघात झाला. एक कार थेट नीरा देवघर धरणात कोसळल्याने तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. पुण्यात गेल्या काही दिवसांपासून दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे पुणे आणि रायगड जिल्ह्याला जोडणारा वरंध घाट सध्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे, मात्र तरीही या घाटमार्गे प्रवास करणे काही तरुणांना महागात पडले आहे. घाटाजवळील धरणात गाडी कोसळल्याने तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर एकजण बचावला आहे. धुके आणि पाऊस असल्यामुळे रस्त्याचा अंदाज न आल्याने हा अपघात झाल्याचे समजते. धरणात गाडी कोसळल्यानंतर चालक कसातरी बाहेर आला, मात्र सीटबेल्ट असल्याने इतर तिघांना बाहेर पडता आले नाही.

अंतरंग
पालकमंत्री उदय सामंत रायगड जिल्हा दौऱ्यावर/२
रेवदंड्यात शिक्षकाचे विद्यार्थिनीशी गैरवर्तन/५
ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे होणार पुनरागमन?/८

### सारा ठाकूरच्या मृत्यूप्रकरणी कुटुंबीयांसह जिते ग्रामस्थ आक्रमक

# पेण उपजिल्हा रुग्णालयाबाहेर आंदोलन

**पेण : प्रतिनिधी**

सर्पदंशाने मृत्युमुखी पडलेल्या पेण तालुक्यातील जिते येथील सारा ठाकूर या मुलीचे कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी शनिवारी (दि. २९) पेण येथील उपजिल्हा रुग्णालयबाहेर आरोग्य यंत्रणेच्या ढिसाळ कारभाराविरोधात ठिय्या आंदोलन केले. दोषींवर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली. या वेळी सर्वपक्षीय नेत्यांनी आंदोलनास पाठिंबा दर्शविला



(छाया : इजाज मनियार)

सारा ठाकूर या १२ वर्षीय मुलीला २५ जुलै रोजी मण्यार साप चावला होता. पेण येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात योग्य उपचार न मिळाल्याने साराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा कुटुंबीयांचा आरोप आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेच्या विरोधात जिते येथील नितीन ठाकूर, अतिष ठाकूर, सरपंच सुप्रिया म्हात्रे, दुरशेत सरपंच दशरथ गावंड, खरोशी महेश पाटील, लीलाधर म्हात्रे, कैलास म्हात्रे, गोरख तांडेल, निलेश तांडेल, निखिल म्हात्रे, जनार्दन म्हात्रे, गजानन म्हात्रे, दीपेश म्हात्रे, जितू ठाकूर, विशाल भोईर यांच्या नेतृत्वाखाली निषेध मोर्चा व ठिय्या आंदोलन करण्यात आले. साराच्या दुर्दैवी मृत्यूला जबाबदार डॉक्टरांवर कारवाई व्हावी याकरिता शेकडो महिला, पुरुषांनी उपजिल्हा रुग्णालय गाठले. त्याचप्रमाणे सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

साराच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या डॉक्टरांना तत्काळ निलंबित करा, रुग्णांना २४ तास उपचार मिळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र व शासकीय रुग्णालयात डॉक्टर्स व नर्स २४ उपलब्ध करण्यात यावेत, प्राथमिक आरोग्य केंद्र व शासकीय रुग्णालयात रुग्णवाहिका व चालक उपलब्ध असणे बंधनकारक करा, रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करावी, प्राथमिक आरोग्य केंद्र व शासकीय रुग्णालय येथे सोयीसुविधा उपलब्ध करा, औषधांचा साठा उपलब्ध करावा, तज्ज्ञ डॉक्टर्स २४ तास उपलब्ध करावेत, उपजिल्हा रुग्णालय येथे ईसीजी, रक्त तपासणी मशिनरी, व्हेन्टीलेटर व इतर तातडीची उपकरणे लवकरात लवकर उपलब्ध करावीत, अशा मागण्या या वेळी करण्यात आल्या.

### सर्वपक्षीयांचा पाठिंबा



या वेळी आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने पेण उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. संध्यादेवी राजपूत यांच्याशी चर्चा केली तसेच दूरध्वनीद्वारे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने व अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांच्याशी चर्चा करण्यात आली.

घटनेच्या दिवशी उपजिल्हा रुग्णालयात ड्युटीवर असलेल्या डॉ. प्रिती पाटील यांना तत्काळ निलंबित करण्यात आले तसेच जिते प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. मिलिंद पाटील यांच्या निलंबनाचा प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आयुक्तांकडे पाठविला आहे. त्यांनाही लवकरच निलंबित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी दिली तसेच इतर मागण्यांची पूर्तता ११ ऑगस्टपर्यंत करण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, माजी जि.प.सदस्य डी. बी. पाटील, विक्रम चालक मालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय पाटील, हरिष बेकावडे, संजय डंगर, नरेंद्र ठाकूर यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची घोषणा

## विनोद तावडेंसह पंकजा मुंडे यांच्यावरही जबाबदारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली आहे. भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी शनिवारी (दि. २९) पक्षाच्या केंद्रीय पदाधिकाऱ्यांची घोषणा केली असून यामध्ये १३ उपाध्यक्ष, आठ सरचिटणीस आणि १२ सचिवांचा समावेश आहे.

पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी सर्वपक्षीयांकडून मोर्चेबांधणी केली जाऊ लागली आहे. लोकसभा निवडणुकांची रंगीत तालीम ठरावी अशा काही राज्यांच्या विधानसभा निवडणुका पुढच्या काही महिन्यांत होणार आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपकडून राष्ट्रीय कार्यकारिणीत फेरबदल करण्यात आले आहेत.



भाजप अध्यक्ष नड्डा यांच्या टीममध्ये नव्या आणि जुन्या चेहऱ्यांचा ताळमेळ बसवण्यात आला आहे. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री रमण सिंह आणि राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे, तर बांदी संजय कुमार आणि राधामोहन अग्रवाल यांना सरचिटणीस बनवण्यात आले आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ए. के. अँटनी यांचे पुत्र अनिल अँटनी यांचाही समावेश भाजपने राष्ट्रीय कार्यकारिणीत केला असून त्यांच्याकडे सचिवपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वीच अनिल यांनी काँग्रेसला रामराम ठोकत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांना कार्यकारिणीत स्थान देण्यात आले आहे.

महाराष्ट्रातून विनोद तावडे यांच्यावर राष्ट्रीय सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. याशिवाय पंकजा मुंडे व विजया रहाटकर यांचा समावेश राष्ट्रीय सचिव म्हणून करण्यात आला आहे.

## पुण्यात पकडलेल्या दहशतवाद्याच्या साथीदारास रत्नागिरीमधून अटक

**पुणे : प्रतिनिधी**

कोथरूडमध्ये अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्याच्या आणखी एका साथीदारास राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) रत्नागिरी परिसरातून अटक केली. त्यामुळे या प्रकरणात एटीएसच्या अटकेत असलेल्यांची संख्या आता चार झाली आहे.


दुचाकी चोरण्याच्या तयारीत असलेल्या इम्रान युनूस खान आणि युनूस याकूब साकी (दोघे रा. रतलाम, मध्य प्रदेश, सध्या कोंढवा) यांना गेल्या आठवड्यात पोलिसांनी अटक केली होती. प्राथमिक तपासामध्ये हे दोघे फरारी दहशतवादी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मिळालेल्या माहितीच्या आधारे या दोघांना आश्रय दिल्याच्या आरोपावरून मूळच्या गोंदियामधील आणि सध्या कोंढवा परिसरात वास्तव्याला असलेल्या अब्दुल कादिर दस्तगीर पठाण याला पोलिसांनी अटक केली होती. या तिघांची एकत्रित चौकशी सुरू आहे. तपासामध्ये रत्नागिरीतील एकाने आर्थिक रसद पुरवल्याची माहिती पुढे आली. त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

## बुलढाण्यात दोन खासगी बसची समोरासमोर धडक

### सहा प्रवाशांचा जागीच मृत्यू, १९ जखमी

**मलकापूर : प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरात राष्ट्रीय महामार्गावरील रेल्वे उड्डाणपुलावर शनिवारी (दि. २९) पहाटे दोन खासगी बसची समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघातात सहा प्रवाशांचा मृत्यू झाला असून १९ जण जखमी झाले आहेत.



अमरनाथची तीर्थयात्रा करून परतणारी खासगी बस (एमएच ०८-९४५८) हिंगोलीच्या दिशेने जात होती, तर दुसरी बस (एमएच २७- बीएक्स ४४६६) नागपूरवरून नाशिकच्या दिशेने जात होती. मलकापूर शहरातून जाणाऱ्या महामार्ग क्रमांक ६वर या दोन बस समोरासमोर धडकून अपघात झाला. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. अपघातातील काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना बुलढाणा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, या अपघाताबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला असून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी पाच लाखांची मदत देण्याचे निर्देश दिले आहेत तसेच जखमींवर शासकीय खर्चाने उपचार करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

### निवडक

#### देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी घेतली न्यायमूर्तीपदाची शपथ



**मुंबई :** अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी शनिवारी (दि. २९) मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदाची शपथ घेतली. राजभवन येथे राज्यपाल रमेश बैस यांनी उपाध्याय यांना पदाची शपथ दिली. या सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

#### कुरुलकरांच्या व्हॉट्सअ‍ॅप चॅटमधून धक्कादायक खुलासे

**मुंबई :** हनीट्रॅपमध्ये अडकलेले 'डीआरडीओ'चे संचालक व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप कुरुलकर आणि त्यांना झारा दासगुप्ता असे नाव सांगणारी पाकिस्तानी महिला यांच्यातील व्हॉट्सअ‍ॅप चॅट्सची माहिती समोर येऊ लागली आहे. यात कुरुलकरांनी भारताच्या काही क्षेपणास्त्रांविषयी झाराशी चर्चा केल्याचे उघड झाले आहे.

## भारतीय संघात निवड झालेल्या तायक्वांदोपटूंचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय तायक्वांदो संघात निवड झालेल्या रायगड जिल्ह्यातील सहा खेळाडूंना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दोन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात येणार असल्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. २९) जाहीर केले. या खेळाडूंनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले.

### दोन लाख रुपयांची मदत


नाशिक येथे इंडिया तायक्वांदो आयोजित चॅम्पियन ऑफ चॅम्पियन अंतिम फेरी, कॅडेट जागतिक तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा तसेच कॅडेट व ज्युनिअर आशियाई तायक्वांदो स्पर्धा निवड चाचणीकरिता अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अटॅकर्स, गुरुकुल आणि वीर तायक्वांदो अकॅडमीमधील एकूण २२ खेळाडू पात्र झाले होते. यातील विजेते खेळाडू भारतीय तायक्वांदो संघासाठी पात्र झाले आहेत. गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीतील राज जाधव, ध्रुव शेट्टी व साई जाधव यांची कॅडेट सांघिक मुले, तर किरण कदम, निशीता पाडेकर व संस्कृती पाटील यांची जुनियर सांघिक मुली या गटांत प्रथम क्रमांक पटकावून २ ते ९ सप्टेंबरदरम्यान लेबनॉन येथे होणाऱ्या आशियाई तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. (पान २ वर..)

# पोलादपूर-महाबळेश्वर आंबेनळी घाटरस्ता १५ दिवसांसाठी बंद

### दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाची खबरदारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर-महाबळेश्वर आंबेनळी घाटरस्त्यावरील दुर्घटना टाळण्यासाठी हा रस्ता शनिवार (दि. २९)पासून पुढील १५ दिवसांकरिता सर्व प्रकारच्या वाहतुकीकरिता बंद करण्यात आला आहे. याबाबतची अधिसूचना जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी जारी केली.



रायगड अपर पोलीस अधीक्षक यांच्या पत्रानुसार अरूंद व वळणाच्या असलेल्या आंबेनळी घाटरस्तालगतच्या डोंगरकड्याचे या भागात पडणाऱ्या पावसामुळे भूस्खलन झाले. या डोंगरावरील माती व मोठ मोठे दगड रस्त्यावर आल्याने तसेच दुसऱ्या बाजूला खोल दरी असल्याने हा घाटरस्ता वाहतुकीस धोकादायक असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.


या रस्त्यावरून वाहतूक सुरू ठेवल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उद्भवून मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तीय हानी होण्याची दाट शक्यता आहे. त्या कारणास्तव हा रस्ता बंद करण्यात येऊन पोलादपूर खेड-चिपळूण-पाटण-कराड-कोल्हापूर तसेच पाटणकडून सातारामार्गे पुण्याकडे असा पर्यायी मार्ग आहेत, असे अभिप्राय सादर केले गेले आहेत. या पार्श्वभूमीवर महाड उपविभागीय दंडाधिकारी यांनी केलेल्या विनंतीनुसार हा घाटरस्ता १५ दिवस सर्व वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

## ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांचे आज पनवेलमध्ये व्याख्यान

**पनवेल :** भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने रविवारी (दि. ३०) सायंकाळी ५ वाजता शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ज्येष्ठ पत्रकार व प्रतिपक्ष या सुप्रसिद्ध युट्यूब चॅनेलचे सर्वेसर्वा भाऊ तोरसेकर यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.



भाऊ तोरसेकर हे सुप्रसिद्ध ज्येष्ठ पत्रकार, वाचकप्रिय ब्लॉगर व लेखक असून स्थानिक राजकारणापासून ते आंतरराष्ट्रीय घडामोडींवर सडेतोड भाष्य करण्यात त्यांची हातोटी आहे. त्यांनी १९६९मध्ये आचार्य अत्रे यांच्या दै. मराठामधून पत्रकारितेच्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांनी सा. भूपुत्र, ब्लिट्झ (मराठी), सकाळ (मुंबई) मधून पत्रकारिता केली. १९८५ ते १९८९ या काळात शिवसेनेचे मुखपत्र मार्मिक या साप्ताहिकातून कार्यकारी संपादक म्हणून काम पाहिले. त्यानंतर विवेक, चित्रलेखा यांसारख्या साप्ताहिकमध्ये त्यांनी काम केले. त्यांचे प्रतिपक्ष नावाचे यूट्यूब चॅनेल आहे, तर भाऊच्या जागता पहारा या ब्लॉगवर ७५ लाखांहून अधिक वाचक आहेत.



# युवकांबद्दल कौशल्याऐवजी भाषेवरून मत बनवणे त्यांच्यावरील सर्वांत मोठा अन्याय

## मातृभाषेमुळे होणाऱ्या भेदभावावर पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुलांना ज्ञान ग्रहण करण्यासाठी मातृभाषेतील शिक्षण आवश्यक असल्याचे अनेक शिक्षणतज्ज्ञ सांगतात, मात्र अनेकदा याच मातृभाषेवरून युवकांना दुजेपणाची वागणूक मिळते, भेदभावाला सामोरे जावे लागते. इंग्रजीत न बोलता मातृभाषेत बोलणाऱ्यांबाबतही पूर्वग्रहदुषित मत बनवले जाते. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हल्ला चढवला आहे. ते शनिवारी (दि. २९) नवी दिल्लीत आयोजित अखिल भारतीय संमेलनात बोलत होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, युवकांबद्दल त्यांच्यातील कौशल्याऐवजी त्यांच्या भाषेवरून मत बनवणे त्यांच्यावरील सर्वांत मोठा



अन्याय आहे.

मातृभाषेत शिक्षण घेतल्याने भारतातील युवकांच्या बुद्धिमत्तेबरोबर खरा न्याय होण्याची सुरुवात होणार आहे. हे सामाजिक न्यायाचे महत्त्वाचे पाऊल आहे.

जगभरात शेकडो वेगवेगळ्या भाषा आहेत. प्रत्येक भाषेचे महत्त्व आहे. जगातील सर्वाधिक विकसित देशांनी त्यांच्या भाषेच्या आधारे विकास साध्य केला आहे. युरोपचेच उदाहरण पाहिले, तर तेथील सर्वाधिक देश आपल्या मातृभाषेचाच वापर करतात. आपल्याकडे इतक्या मोठ्या प्रमाणात समृद्ध भाषा असताना आपल्याच भाषांना मागास असल्याप्रमाणे वागवले. यापेक्षा मोठे दुर्दैव काय असू शकते, असे मत पंतप्रधान मोदींनी व्यक्त केले.

एखादा व्यक्ती कितीही हुशार असला आणि त्याला इंग्रजी येत नसेल, तर त्याच्या बुद्धिमत्तेला स्वीकारले जात नव्हते. यामुळे सर्वाधिक नुकसान ग्रामीण भागातील हुशार मुलांचे झाले. आता देशाच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाच्या काळात आपण मातृभाषेबद्दलच्या कमीपणाच्या भावनेला मागे टाकले आहे, असेही पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

### लहानग्यांसोबतचा व्हिडीओ व्हायरल

*शिक्षण परिषदेच्या निमित्ताने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी वेगळ्या अंदाजामध्ये दिसून आले. याचा व्हिडीओ त्यांनी ट्विटरवरून शेअर केला आहे. व्हिडीओमध्ये दिसते की, ते एका वर्गात पोहचतात आणि चिमुकले त्यांच्याभोवती गलका करून नमस्ते मोदीजी असे म्हणतात. त्यावर पंतप्रधान विचारतात, तुम्हाला मोदीजी माहिती आहेत का? मुले म्हणतात, हो. आम्ही तुम्हाला टीव्हीमध्ये बघितले आहे. कुणी म्हणते मी तुमचा फोटो बघितलाय. तेवढ्यात लाल शर्ट घातलेला चिमुकला येतो व थेट मोदींना बिलगतो. उपस्थित सगळेच आवाक् होतात. त्यानंतर पंतप्रधान चिमुल्यांना काही प्रश्न विचारतात व त्यांच्यात सहभागी होतात.*

## कळंबोलीतील सुविधांबाबत होणारी नागरिकांची गैरसोय दूर करण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीमधील सेक्टर १२, १३, १४ व १५ येथील नागरिकांची सुविधांबाबतीत होणारी गैरसोय सिडकोने दूर करावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोकडे निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका प्रमिला रविनाथ पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे ही समस्या मांडली. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांना निवेदन देऊन प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे.



या निवेदनात म्हटले आहे की, सन १९९५-१९९६च्या आसपास कळंबोली सेक्टर १२, १३, १४ व १५ या ठिकाणी सिडकोतर्फे अल्प उत्पन्न गटाकरिता निवासासाठी २४, २८, ३२ चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडांचे वितरण करण्यात आले. हे भूखंड मुख्य रस्त्याच्या आतील बाजूस असून समोरील जागा ही रस्त्यासाठी तसेच या निवासी लोकांसाठी पार्किंग व इतर सामाजिक सोयीसुविधांकरिता राखीव असल्याचे सिडकोतर्फे सांगण्यात येत होते. आता त्या जागेवर सिडको थोड्या जास्त क्षेत्रफळाचे भूखंड पाडून ते रो-हाऊस करिता वितरित करणार असल्याचे समजते. सिडकोने त्यांच्या जागा विकण्यास हरकत नाही, पण ते करीत असताना पहिल्यापासून अस्तित्वात असलेल्या नागरिकांना नागरी सुविधा पुरविण्याबाबत, प्राधान्य असायला हवे. २०-२५ वर्षांपूर्वी सिडकोनेच विकलेल्या भूखंडावरील नागरिकांकरिता पार्किंग, रस्ते, गटारे याचे योग्य प्रकारे नियोजन करूनच उर्वरीत भूखंडांची विक्री केली पाहिजे. तेथील रहिवाशांच्या मतानुसार जर वरील प्रकारे सिडकोने भूखंडाचे वितरण केल्यास आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दलाच्या गाड्या, रुग्णवाहिकादेखील येण्यास अडचण होणार असून त्यामुळे भविष्यात एखादा गंभीर प्रकार उद्‌भवण्याची भीती आहे.

वारंवार नवीन पनवेल, कळंबोली येथे सिडकोतर्फे असे प्रकार घडत असून ते खेदजनक आहे. 'शहरांचे शिल्पकार' ही बिरूदावली मिरवताना सिडकोतर्फे नियोजनबद्ध विकास अपेक्षित आहे.

प्रथम वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या वाहनांकरिता व्यवस्थित पार्किंगची सोय, रस्ते, गटारे या सुविधा पुरवणे गरजेचे असतानाही पार्किंगसाठी राखीव भूखंडाची सर्रास विक्री होत आहे. पार्किंगची सोय करायची नाही व नंतर अनधिकृत पार्किंगबाबत ओरड करायची हे विस्मयकारक असून या बाबतीत योग्य ती कार्यवाही करावी, अशीही सूचना या निवेदनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

# शिकवणीच्या नावाखाली मुलींना धर्मांतराकडे लोटण्याचा गोरखधंदा

**अहमदनगरच्या राहुरीतील धक्कादायक प्रकार; तिघांना बेड्या**

**अहमनगर : प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यामधील उंबरे गावातील दोन समाजात झालेल्या वादाची पार्श्वभूमी आता समोर आली आहे. अल्पवयीन मुलींना शिकवणीच्या नावाखाली एका शिक्षिकेने धर्मांतराकडे लोटण्याचा गोरखधंदा सुरू केलेला होता. मुलींना धर्मांतर करण्यासाठी प्रवृत्त करण्यासोबतच नकार देणाऱ्या मुलींना धमकावले जात होते. हिंमत करून एका मुलीने गुन्हा दाखल केला. त्यानंतर आणखी दोन मुलींनी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी एका महिलेसह तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

उंबरे गावात आठवी, नववीत शिकणाऱ्या लहान मुलींना धर्मांतराच्या चक्रव्यूहात अडकवण्याचा धक्कादायक प्रकार सुरू होता. गावातील एक शिक्षिका कोचिंग क्लासेस चालवते, मात्र शिकवणीच्या नावाखाली अल्पवयीन हिंदू मुलींना इस्लाम कसा चांगला आहे, या धर्मात आलात तर काय फायदे आहेत याची शिकवणी सुरू होती. धक्कादायक म्हणजे काही मुलींची मुस्लीम तरुणांसोबत ओळख करून देऊन त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढण्याचाही प्रकार समोर आला आहे. विरोध केला तर फोटो, व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन त्यांचे तोंड बंद केली जात होती. काही मुलींनी तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणाला वाचा फुटली आहे.

आरोपी महिलेचे नाव हिना शेख असे आहे. ती गावात ट्यूशन क्लासेस चालवायची. ट्यूशनला येणाऱ्या मुलींना इस्लाम धर्माबाबत माहिती दिली जायची तसेच मुस्लीम मुलांशी मैत्री करायला भाग पाडायची. बांगड्या घालून शिकवणीला येत जाऊ नका असे मुलींना सांगितले जात होते. रमजानच्या दिवशी ट्यूशनमधल्या काही मुलींचे मुलांसोबत फोटो काढले. त्यानंतर ते फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन मुलींवर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी दबाव टाकला जाऊ लागला. शेवटी मुलींनी घाबरून हा प्रकार घरी सांगितला.

या प्रकारासंदर्भात राहुरी पोलिसांनी गुन्हा दाखल केले असून एका महिलेसह तीन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात आधिक तपास सुरू असून प्रकरणात आरोपी दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाणार असल्याची माहिती राहुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक धनंजय जाधव यांनी माध्यमांना दिली.

### ▮ सखोल चौकशीचे आदेश

*महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उंबरे गावातील घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत तसेच ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशा घटना घडतील तेथील पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.*

## पालकमंत्री उदय सामंत रायगड जिल्हा दौऱ्यावर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत रायगड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत विविध बैठका, कार्यक्रम होणार आहेत.

पालकमंत्री सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. ३०) सकाळी ११ वाजता रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृह, नियोजन भवन येथे होणार आहे. नियोजन समिती बैठकीनंतर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमानुसार रायगड जिल्ह्यासाठी तयार करण्यात आलेल्या अ‍ॅण्ड्राईड मोबाईल अ‍ॅपचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. यानंतर दुपारी १ वाजता रायगड जिल्हा डोंगरी विभाग विकास समितीची बैठक, १.३० वा. रायगड जिल्हा शबरी घरकुल योजना सन-२०२३-२४ची बैठक आणि २ वाजता पत्रकार परिषद करून ना. सामंत मुंबईकडे रवाना होतील.

## भाजप बेस्ट कामगार संघ व महाव्यवस्थापक यांच्यात बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप बेस्ट कामगार संघाचे सरचिटणीस गजानन नागे यांनी बेस्ट महाव्यवस्थापक विजय सिंघल यांच्यासोबत मीटिंग करून बेस्ट उपक्रमात असलेल्या अधिकारीवर्गाचा मनमानी कारभार तसेच कामगारांच्या विनाकारण बदलीसंदर्भात काही ठराविक युनियनच्या कार्यकर्त्यांना सांभाळण्याचे काम काही अधिकारी करीत आहेत ही गोष्ट महाव्यवस्थापक यांच्या लक्षात आणून दिली.

अधिकारी व उद्धव ठाकरे सेना समर्थक असे अनेक डीएम व अधिकारी कर्तव्यात कसूर करून कामगारांना नाहक त्रास देतात. अशा अधिकाऱ्यांवर महाव्यवस्थापक यांनी कारवाई करावी, दादागिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना उपक्रमात जबाबदाऱ्या देऊ नये, त्यांना त्यांच्या



योग्यतेनुसार जबाबदारी द्यावी, असे अनेक प्रश्न या बैठकीत आक्रमकपणे मांडण्यात आले. बेस्ट उपक्रमात काही जावई म्हणून उबाठा सेना समर्थक बसलेले अधिकारी यांच्यावर कारवाई करून ताबडतोब हकालपट्टी करा, असे भाजप युनियनतर्फे सांगण्यात आले तसेच काही अपंग व आजारी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती देण्यात यावी, शॉप रेकॉर्डर यांना पाच दिवसांचा आठवडा करण्यात यावा, उपक्रमात सेवेमध्ये कार्यरत असलेले निरीक्षक यांना पदोन्नती निरीक्षकाची ग्रेट प्रदान करण्यात यावी, बेस्ट उपक्रमाचा बसताफा ३३३७ पूर्ववत करण्यात यावा, कामगारांचे थकीत देणी लवकरात लवकर अदा करण्यात यावी, कामगारांना विनाकारण बदली करणे थांबवण्यात यावे, सेंट्रल रेल्वेच्या लाईनवर राहणारे बदलापूर, कल्याण साईटचे बेस्ट कर्मचारी यांची बदली वेस्टर्न साईटच्या आगारात करू नये, सेंट्रल लाईनवरच त्यांना ड्युटी देण्यात यावी, अशा अनेक प्रश्नांवर महाव्यवस्थापकांना निवेदन देण्यात आले.

अभिलेखकाच्या प्रश्नावर भाजप बेस्ट कामगार संघाचे उपाध्यक्ष बबन बारगजे यांनी त्यांची बाजू व्यवस्थितपणे महाव्यवस्थापक यांना सांगितली. या वेळी ज्येष्ठ उपाध्यक्ष आनंदा जरग, बबनराव बारगजे, संतोष काटकर, श्रीकांत गलांडे, खजिनदार अनिल यादव, चिटणीस राजकुमार घार्गे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. जर प्रशासनाने कामगारांच्या प्रश्नाचा आणि त्याच्यावर होत असलेला अन्याय थांबत नसेल, तर लवकरच आंदोलनाचा पवित्रा युनियनला घ्यावा लागेल, असे या वेळी गजानन नागे यांनी महाव्यवस्थापक यांना सांगितले.

दरम्यान, लवकरच उबाठा समर्थक अधिकारांवर कारवाईची मोहीम राबविण्यात येणार असून आगारातील कामगारांनी भाजप बेस्ट कामगार संघ आगारातील अध्यक्षांसोबत संपर्क साधून लेखी स्वरूपात माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

## राज्यातील नवीन साकवांसाठी १३०० कोटींचा आराखडा

### मंत्री रवींद्र चव्हाण यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील डोंगरी तालुके, कोकण आणि आदिवासी भागातील सर्व रस्ते बारमाही वाहतुकीसाठी जोडण्यासाठी नवीन साकव व्हावेत, अशी अनेक ठिकाणांवरून मागणी आहे. यासाठी सुमारे १३०० कोटींचा आराखडा तयार करण्यात येत आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी विधानसभेत दिली.

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील शिंदे ते आरव येथील लोखंडी पूल दुरुस्तीदरम्यान झालेल्या अपघाताबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित झाला होता. यावर मंत्री चव्हाण म्हणाले की, महाबळेश्वर तालुक्यातील शिंदी ते आरवदरम्यानच्या तुटलेल्या पुलाच्या कामाची निविदा मंजूर करण्यात आली असून ते काम पुढील पावसाळ्यापूर्वी पूर्ण केले जाईल.

या आराखड्यातून ओढे, नाले यावरील छोटे पूल पक्क्या स्वरूपात बांधले जातील आणि अशा साकवांसाठी एक कोटीपर्यंतचा निधी उपलब्ध करून दिला जाईल.

पान १ वरून

## भारतीय संघात निवड झालेल्या तायक्वांदोपटूंचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

या सर्व खेळाडूंनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या पनवेल येथील निवासस्थानी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या खेळाडूंचे अभिनंदन व कौतुक करीत आशियाई स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या तसेच दोन लाख रुपये श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने देण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि राष्ट्रीय प्रशिक्षक तुषार सिनलकर, तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अध्यक्ष अ‍ॅड. प्रज्ञा भगत, उपाध्यक्ष संजय भोईर, सचिव सचिन माळी, खजिनदार रोहित सिनलकर आदी उपस्थित होते.

## शालेय साहित्यवाटप कार्यक्रमात बदल

**पनवेल : वार्ताहर**

सद्‌गुरू श्री साई नारायणबाबा यांच्या आशीर्वादाने यांच्या ४८व्या वर्षी पनवेल परिसरातील ६०० शालेय विद्यार्थ्यांना पनवेल रेल्वे स्टेशनजवळील साईबाबा मंदिरात येत्या रविवारी (दि. ३०) दुपारी १२ ते २ या वेळात शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता, मात्र पावसाच्या कारणामुळे शाळा बंद असून या कार्यक्रमाला लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होणार नसल्याने हा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. आता हा कार्यक्रम ६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे.

श्री साई नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्ट, श्री साई नारायणबाबा आश्रम, श्री साईबाबा मंदिर पनवेल यांच्या वतीने यांच्या ४८व्या वर्षी सद्‌गुरू साई नारायणबाबा यांच्या आशीर्वादाने पनवेल परिसरातील गरीब व गरजू शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांसह शाळेचा गणवेश व दप्तरचे वाटप करण्यात येणार होते, मात्र पावसामुळे शाळा बंद असल्याकारणाने या कार्यक्रमाला लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होणार नसल्याने हा कार्यक्रम ६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थेचे पदाधिकारी रामलाल चौधरी यांनी दिली.

## कामोठ्यातील रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची मागणी

### डॉ. अरुणकुमार भगत यांचे आयुक्तांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील रस्त्यांच्या निकृष्ठ दर्जा सुधारण्यात यावा, अशी मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

डॉ. भगत यांनी निवेदनामध्ये म्हटले आहे की, पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील विविध रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम करण्यात आलेले आहे. या कामाचा दर्जा अत्यंत खराब असून ते काम पुर्णपणे निकृष्ठ दर्जाचे असल्याबाबत निर्दर्शनास आलेले आहे. रस्त्यांचे डांबरीकरण करताना काही तांत्रीक मुद्द्यांचा विचार न करता रस्त्यावर फक्त खडी अंथरुन त्यावर डांबरीकरण करण्यात आलेले असून काही ठिकाणी फक्त खडी पसरून ठेवलेली आहे यामुळे अपघात होण्याचे प्रमाणही वाढलेले आहे. यामुळे रस्ते बऱ्याच ठिकाणी खचलेले असून त्यावर खड्डे पडून पाणी साठलेले आहे. त्यामुळे कामोठे येथील रस्त्यांची दुरुस्ती तांत्रीकदृष्टया योग्य पध्दतीने करण्यत यावी जेणेकरून नागरिकांना यामुळे गैरसोयीस सामोरे जाणार नाही व महापालिकेला या रस्त्यांची वारंवार दुरुस्ती करावी लागणार नाही.

ठेकेदाराला याबाबत योग्य ती समज देण्यात यावी. यासोबतच पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील रस्त्यांचे दुरुस्तीकाम पुन्हा नव्याने करून देऊन या परिसरातील नागरिकांना उपकृत करण्यात यावे, असेही निवेदनात डॉ. भगत यांनी नमूद केले आहे.

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुरस्कार; सहभागासाठी आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल्या वर्षीप्रमाणे यावर्षीही उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या इमेलवर दि.५ सप्टेंबर २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना सहभागी होता येईल. सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची पुरस्कारासाठी निवड पुढील निकषांच्या आधारे करण्यात येईल.

पर्यावरणपूक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट (थर्माकोल/प्लॅस्टीक विरहीत), ध्वनीप्रदूषण रहित वातावरण, पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्धा निर्मूलन, इ.समाज सामाजिक सलोखा प्रबोधन, सजावट/देखावा किंवा स्वांतत्र्याच्या चळवळीसंदर्भात छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या



राज्याभिषेक वर्षानिमित्ताने सजावट/देखावा, गणेशोत्सव मंडळाने रक्तदान शिबीर, वर्षभर गड किल्ले, सवंर्धन, पर्यावरण रक्षण, सेंद्रीय शेती, सौर उर्जाबद्दल, जागरुकता निर्माण करणे, अ‍ॅम्बुलन्स चालविणे, वैद्यकीय केंद्र चालविणे सामाजिक, कार्यशाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक, आरोग्य, इत्यादीबाबत केलेले कार्य महिला, ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या शैक्षणिक / आरोग्य/ सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम/स्पर्धा पारंपरिक/देशी खेळांच्या स्पर्धा, गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा उदा.पाणी/ प्रसाधनगृह, वैद्यकीय प्रथमोपचार, वाहतुकीस अडथळा येणार नाही असे आयोजन, आयोजनातील शिस्त, परिसरातील स्वच्छता आदी बाबींचा गुणांकनासाठी विचार केला जाणार आहे.

बाबींची पूर्तता करणाऱ्या/करु शकणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी करावयाच्या अर्जाचा नमुना या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ येथे आहे जिल्हास्तरावरील स्पर्धेसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येऊन जिल्हयातून एक उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची शिफारस राज्य समितीकडे करण्यात येऊन २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकविणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास पाच लाख रुपये, द्वितीय क्रमांकास दोन लाख ५० हजार आणि तृतीय क्रमांकास एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

याबाबतचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून २०२३०७०४१६३११८२१२३ असा त्याचा संकेतांक क्रमांक आहे.

### आमदार महेश बालदींच्या सूचनांची तत्काळ दखल

# आपट्यातील माडभुवनवाडीचे स्थलांतर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपटा ग्रामपंचायत अंतर्गत सारसई माडभुवन या आदिवासी ठाकूर वस्तीलाही इर्शाळवाडीप्रमाणे दरडींचा धोका निर्माण झाला. त्यामुळे आमदार महेश बालदी यांनी प्रशासनाला सूचना केल्या. त्यानुसार प्रशासनाने तत्काळ दखल घेत माडभुवन वाडीचे स्थलांतर केले.



पनवेल तालुक्यातील आपटा ग्रामपंचायत हद्दीत सारसई माडभुवन ही आदिवासीवाडी गेली कित्येक वर्षे डोंगराच्या पायथ्याशी वास्तव्य करीत आहे. गेल्या वर्षापासून या वाडी लगत असलेल्या डोंगराला आपोआप तडे जात आहेत. ही बाब येथील ग्रामस्थांनी स्थानिक माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत आणि उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या निदर्शनास आणून दिली. या वेळी आमदार महेश बालदी यांनी तत्काळ दखल घेऊन प्रशासनाला सूचना केल्या आणि ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे सूचित केले.

यानंतर दुसऱ्याच दिवशी तहसीलदार विजय पाटील, गट विकास अधिकारी संजय भोये, जि.प.सदस्य ज्ञानेश्वर घरत, वन विभागाचे अधिकारी काटकर साहेब यांनी संयुक्त रित्या वाडीला भेट दिली आणि प्रतेक्ष डोंगरावर चढून नैसर्गिक पडलेल्या भेगांची पाहणी केली.

या वेळी उपस्थित तहसीलदारांनी येत्या दोन दिवसांत ग्रामस्थांना स्थलांतरित करण्याचे आदेश प्रशासनाला दिले होते. जवळच असलेल्या कर्नाळा गार्मेंटचे रिकाम्या इमारतींमध्ये सुव्यवस्था करून सारसई माडभुवन आदिवासीतील सर्व कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आले या वेळी रा. जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत तहसीलदार विजय पाटील नायब तहसीलदार संभाजी शेलार मंडळ अधिकारी तुषार काकडे, तलाठी एस. टी. तवर, सरपंच नाजनीन पटेल भाजप नेते व माजी सरपंच विजय मिरकुटे, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, ग्रामसेविका वैशाली जाधव व ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

**ज्ञानेश्वर घरत यांच्याकडून पाहणी**

**या वस्ती लगत असलेल्या डोंगराला गेल्या वर्षापासून पावसाळ्यात तडे जात आहेत. डोंगर कधीही खचून ही दरड वाडीत येऊ शकते, अशी भीती ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. याचे गांभीर्य लक्ष्यात घेऊन आमदार महेश बालदी यांनी तातडीने प्रशासनाला सूचना दिल्या आहेत त्याचाच एक भाग म्हणून माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांनी प्रत्यक्ष डोंगरावर जाऊन डोंगराला पडलेल्या भेगांची पाहणी केली आणि ग्रामस्थांना जागृत राहण्याच्या सूचना दिल्या तसेच पनवेल तहसीलदारांना संपर्क करून तातडीने पाहणी करून पुढील उपाययोजना करण्याची विनंती केली होती.**

# धूर फवारणी करून घेण्याचे आवाहन



**पालिका क्षेत्रात वेळोवेळी औषध तसेच धुरीकरण केले जाते. आरोग्य विभागाच्या वतीने याबाबत जनजागृतीदेखील केली जाते. आपला परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी देखील पुढाकार घ्यावे.**

**–सचिन पवार,**
**उपायुक्त, पनवेल महापालिका**

**खारघर : प्रतिनिधी**

पावसाळ्यात घराबाहेर काही ठिकाणी पाणी साचुन त्यात मच्छरांची उत्पत्ती होत असते. हेच मच्छर पुढे मलेरिया, डेंग्यू सारख्या आजारांना निमंत्रण देत असतात. याकरिता आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची गरज आहे. घराबाहेरील डबक्यात पाणी साचुनदेखील त्याठिकाणी मच्छरांची निर्मिती होते. याकरिता पालिका प्रशासन जनजागृती मोहीम राबवत असते, मात्र या डासांवर नियत्रणासाठी पालिकेच्या माध्यमातून धुरीकरण तसेच औषध फवारणी केली जाते. काही जण त्याला विरोध दर्शवत असतात, मात्र धुरीकरण व औषध फवारणीचा जंतुनाशक म्हणुन होत असल्याने नियमित वेळेत फवारणी करण्याची गरज आहे.

वातावरणातील बदलामुळे दरवर्षीच पावसाळ्याच्या दिवसात डासांची उत्पत्ती त्रासदायक ठरते. डेंग्यू, मलेरिया यासारखे धोकादायक आजारापासून नागरिकांना त्रास होऊ नये, याकरिता फवारणी पालिकेच्या माध्यमातून प्रभाग निहाय सुरू आहे. मात्र नागरिकांनी देखील स्वतःचा घर व परिसर स्वच्छ ठेवण्याकरिता पुढाकार घेण्याची गरज आहे. पालिकेच्या माध्यमातुन विषाणु बाधित डास आढळलेल्या परिसराची स्वच्छता करून त्याठिकाणी फवारणी केली जाते. याकरिता टेमिफॉर्स या औषधाचा वापर फवारणीसाठी केला जातो.

आरोग्य विभागाच्या वतीने धुरीकरण तसेच फवारणीसाठी ६८ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. चारही प्रभागात ठरवून दिलेल्या दिवसांमध्ये हि फवारणी केली जाते. डेंग्यू पसरविणाऱ्या डासांची 'एडिस' अंडी तर एका मलेरियास कारणीभूत ठरणाऱ्या 'ॲनाफिलीस' डासांची अंडी असतात.

## निवडक

### लक्ष्मण दलांडे अभियंतापदी

**मोहोपाडा :** मोहोपाडा येथील विज वितरण मंडळातून किशोर पाटील यांची पनवेल सिटी येथे बदली झाल्याने त्यांच्या जागेवर लक्ष्मीकांत लालासाहेब दलांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लक्ष्मीकांत दलांडे यांनी गेल्या पंधरा वर्षे महाराष्ट्र विजवितरणात सेवा केली आहे. याअगोदर त्यांच्याकडे खोपोली विजवितरणाची जबाबदारी होती. त्यांनी त्यांच्या सेवाकार्यांत औरंगाबाद, दापोली, खोपोली येथे चोख सेवा बजावली आहे. मोहोपाडा विज वितरणाच्या सहाय्यक अभियंता पदावर लक्ष्मीकांत लालासाहेब दलांडे यांनी कार्यभार सांभाळताच त्यांना सर्वपक्षीय पदाधिकारी व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. लक्ष्मीकांत लालासाहेब दलांडे यांच्या विजवितरणातील तत्पर सेवा देणारे अधिकारी म्हणून सर्वत्र ओळख आहे.

### कोंबड्या चोरणारे अटकेत

**पनवेल :** बॉयलर कोंबड्यांसह सिलेंडर व शेगड्यांची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना पनवेल तालुक्यातील खैरणे गावाच्या हद्दीत घडली होती. या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले आहे. खैरणे गावाच्या हद्दीत असलेल्या सरदार चिकन शॉप व राजू चिकन शॉपमधील बॉयलर कोंबड्या, सिलेंडर व शेगडी असा मिळून तीन हजार ४८० रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी कोंबडी ठेवण्याचे लोखंडी पिंजऱ्याचे तोडून नुकसान केल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने याप्रकरणी तांत्रिक तपास व गुप्त बातमीदारांच्या सहाय्याने आरोपी बाप्पा मंडल (वय ४२, रा. ढोंगऱ्याचा पाडा) व उत्तम सरकार (वय ३३, रा. ढोंगऱ्याचा पाडा) या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

### मनोजकुमार म्हेत्रे सेवानिवृत्त



**उरण :** तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे, येथील प्रभारी प्राचार्य मनोजकुमार मारुतीराव म्हेत्रे हे आपल्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून ३१ जुलै २०२३ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सेवपूर्ती कार्यक्रम शुक्रवारी (दि. २८) झाला. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे चेअरमन कृष्णा कडू, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, रायगड विभागीय सहाय्यक अधिकारी एस. एस. फडतर, स्कूल कमिटी सदस्य यशवंत ठाकूर, सुरेश म्हात्रे, जासई शाखेचे प्राचार्य घाग सर उपस्थित होते. ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे यांनी आपल्या प्रास्ताविक केले. उपस्थित मान्यवर, विद्यालयाचे पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे आणि कार्यालय प्रमुख एम. पी. तुमडे या सर्वांच्या हस्ते सत्कारमूर्ती मनोजकुमार म्हेत्रे यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन एच. एन. पाटील आणि दर्शना माळी यांनी केले तर आभार एस. डी. म्हात्रे यांनी मानले.

# 'सीकेटी'त कारगिल विजय दिन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभाग आणि नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने कारगिल विजय दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.

यावर्षी कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधून खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल पिसाळ, रोट्रेक्ट क्लबचे अध्यक्ष गिरीश समुद्रा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य मा. प्रो. डॉ. एस. के. पाटील, असोसिएट एन सी सी ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे, तसेच ग्रंथपाल रमाकांत नवघरे व सर्व प्राध्यापकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कारगिल विजय दिवस निमित्त प्रमुख पाहुणे खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल पिसाळ, रोट्राक्ट क्लब चे अध्यक्ष गिरीश समुद्रा आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी शहीदांना पुष्पहार अर्पण करून मेणबत्ती प्रज्वलित केली व आदरांजली वाहिली. यानंतर असोसिएट एनसीसी ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे व प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि प्रमुख पाहुण्यांनी चित्तथरारक व प्रेरणादायी कारगिल युद्धाविषयी कॅडेट्सना माहिती दिली. ज्यामध्ये भारतीय सैन्याने देशाच्या रक्षणासाठी केलेल्या बलिदानावर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांना त्यांचे भविष्य जवान आणि अधिकाऱ्यांप्रमाणे घडवण्यासाठी मन, चेतना आणि विचार या मूलभूत तत्त्वांचा वापर करून त्यांचे अनुकरण करण्यास प्रवृत्त केले. या कार्यक्रमासाठी ९६ कॅडेट्स सहभागी झाले होते.

या वेळी महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील शाह उस्मान अली, मनीषा रोहिन्दिया व एम. अरबाज अब्दुल रहमान या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर शहिदांची आठवण काढत गीते गायली व एनसीसी कॅडेट्सनी कारगिल युद्धाच्या प्रसंगावर आधारित नाटक, नृत्य व देशभक्तीपर गीते सादर केली.

या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ.बी.डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएट एनसीसी ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे, रमाकांत नवघरे, ग्रंथपाल आणि कॅडेटस् यांनी अथक परिश्रम केले.





**पनवेल : भाजप महिला मोर्चाच्या शहर सरचिटणीस सपना पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा नाईक, लीना पाटील, कविता पाटील, जयश्री कमरकर, करुणा कनुगोजे उपस्थित होते. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनीही सपना पाटील यांना दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.** (छाया : विकास म्हात्रे)

# विद्यार्थ्यांसाठी कायदा जागरूकता शिबिर

**पनवेल, अलिबाग : वार्ताहर**



पनवेल येथी सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ कॉलेजच्या वतीने अभ्यासाच्या दृष्टिकोनातून प्रात्यक्षिक माहिती मिळण्याकरिता तसेच कोर्ट, पोलीस ठाण्यामध्ये कामकाज कसे चालते हे अनुभव विद्यार्थ्यांना देण्याकरिता अलिबाग येथील कोर्ट व पोलीस ठाण्याला भेट देण्यात आली.

या वेळी कोर्टात जिल्हा कायदेशीर सहाय्य प्राधिकरणाचे सचिव अमोल शिंदे यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर मदत सेवांचे महत्त्व समजावून सांगितले.

अलिबाग बार असोसिएशनचे रायगड जिल्हा अध्यक्ष अॅड. प्रसाद पाटील यांनी त्यांच्या व्यावसायिक जीवनातील अनुभव विद्यार्थ्यांबरोबर शेअर केले. आणि विद्यार्थ्यांना न्यायाधीशांमध्ये नैतिकता आणि स्वत:चे प्रातिनिधिकता याबद्दल सांगितले. न्यायालयाच्या कामकाजाचेही स्पष्टीकरण दिले.

रायगड जिल्हा पोलीस दलाचे अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पुस्तकांच्या केसेसच्या रोजच्या वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले. सरावात नवशिक्यासाठी कायद्याच्या क्षेत्रातील अधिक ज्ञानाची जाहिरात करतात. ज्ञान आणि अनुभवाचे मूल्य कमवा असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. या भेटीचा व माहितीचा विद्यार्थ्यांना फायदा होईल, असे मत प्राचार्य ललित पगारे आणि अभिनव दुबे यांनी व्यक्त केले.

प्रा. ललित पगारे, प्रा. अभिनव दुबे, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने ही भेट यशस्वी झाली.

# बँक ऑफ महाराष्ट्राची स्वातंत्र्यसेनानीप्रति कृतज्ञता

**पनवेल : वार्ताहर**

देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून बँक ऑफ महाराष्ट्राने आपले सन्माननीय स्वातंत्र्यसेनानी खातेदारांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची भारतभर मोहित राबवित आहे. ह्याच अनुषंगाने नवी मुंबई झोनच्या अंतर्गत नवीन पनवेल शाखेने त्यांचे स्वतंत्र सेनानी कुटुंबीय ग्राहक मैनाबाई दीक्षित यांचा मोठ्या सन्मानाने त्यांच्या निवास्थानी जाऊन आदर सत्कार करून



कृतज्ञता व्यक्त केली व आशीर्वाद घेतला.

बँक ऑफ महाराष्ट्र स्वातंत्र्य सेनानींनी केलेल्या त्यागाचे मोल जाणून आहे. बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या भारत भर शाखामधील स्वातंत्र्य सेनानींचा खातेदार व त्यांच्या कुटुंबियांप्रति त्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करीत आहे. ह्याच अनुषंगाने बँक ऑफ महाराष्ट्र नवी मुंबई झोन मध्ये झोनल मॅनेजर संजयकुमार चौरासिया, उप झोनल मॅनेजर सौरभ सिंग, मुख्य प्रबंधक संगिता देसाई व बी.डी.ओ. प्रसेनजीत अंकुश यांच्या मार्गदर्शनखाली नवीन पनवेल शाखेने त्यांचे स्वतंत्र सेनानी कुटुंबीय ग्राहक श्रीमती मैनाबाई दीक्षित यांचा मोठ्या सन्मानाने त्यांच्या निवास्थानी जाऊन आदर सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली व आशीर्वाद घेतला.

या वेळी नवीन पनवेल शाखेच्या शाखा प्रबंधक नम्रता कामडी व विशेष सहाय्यक अरविंद मोरे उपस्थित होते. शाखा प्रबंधक नम्रता कामडी यांनी जिव्हाळ्याने स्वातंत्र्य सेनानी कुटुंबीय श्रीमती मैनाबाई यांची खुशाली विचारून त्यांना चांगले स्वास्थ व उदंड आयुष्य लाभो अशी मनोकामना व्यक्त केली. तसेच बँके तर्फे पुस्तकरूपी भेट, बुके व मिठाई देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी त्यांच्या मुलगी आशा सुदामराव दीक्षित व नातू दर्शन हसमुख दीक्षित सुद्धा उपस्थित होते. दीक्षित कुटुंबीयांनीसुद्धा बँकेने सत्कार केल्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्रचे आभार मानले व बँकेने दखल घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. नावीन्यपूर्ण उपक्रम बँक राबवित असल्याबद्दल बँकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पनवेलमध्ये रंगला 'मल्हार' महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात काही राग दिवस अथवा रात्रीच्या वेगवेगळ्या प्रहरानुसार गायले जातात, तर काही राग केवळ विशिष्ट ऋतूतच गायले जातात. मल्हार हा खास वर्षाकालीन राग म्हणून ओळखला जातो. मल्हार रागाचे उपप्रकार असलेल्या मियाँ मल्हार, गौड मल्हार, नट मल्हार, रामदासी मल्हार, मेघ मल्हार, जयंत मल्हार अशा रागांची रसिकांना ओळख व्हावी म्हणून पनवेल कल्चरल असोसिएशनने आपल्या सभागृहात



नुकतेच मल्हार महोत्सवाचे आयोजन केले होते.

यात महेश राव यांनी सूर मल्हार, अजय ठोसर यांनी जयंत मल्हार, संध्या खांबेटे यांनी मेघ मल्हार तर मिलिंद गोखले यांनी नट मल्हार सादर केला. याशिवाय प्रकाश चिटणीस यांनी हार्मोनियमवर रामदासी मल्हार सादर केला. या सर्व गायकांना हार्मोनियमवर साथसंगत केली प्रकाश चिटणीस आणि ओजस जोशी यांनी, तर तबलासाथ केली प्रदीप दीक्षित आणि विनायक प्रधान यांनी.

या वेळी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे परीक्षक-निरीक्षक महेश कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध गायक पं. मोहनकुमार दरेकर हे विशेष अतिथीरुपात उपस्थित होते.

रुचा देशमुख यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# केंद्रीय विद्यालयात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी

**खारघर : प्रतिनिधी**

सर्वांसाठी समावेशक आणि गुणवत्तापुर्ण शिक्षण सुनिश्चत करणे आणि सर्वांसाठी शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करणे या उद्देशातून सन २०२० सालापासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यास सुरुवात झाली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्याचे हे तिसरे वर्ष आहे. या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत विविध शैक्षणिक कार्यक्रम केंद्रीय विद्यालय ओएनजीसी पनवेल शाळेमध्ये राबविले जात असल्याचे शाळेचे प्राचार्य विजयकुमार गर्ग यांनी सांगितले.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय विद्यालय ओएनजीसी यांच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमावेळी ते बोलत होते. या वेळी नवोदय विद्यालयाचे प्राचार्य के. वाय. इंगळे, केंद्रीय विद्यालय उपप्राचार्य सोहन लाल, जि.प.प्रा.शा.चे केंद्रप्रमुख एन. के. गीते, मुख्याध्यापक जि.प.प्रा शाळा काळद्रे श्री प्रेमलाल रामावतार, पनवेल महापालिकेचे वैभव पाटील, आणि शाळेचे सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता.

या वेळी नवोदय शाळेचे प्राचार्य के. वाय. इंगळे आणि केंद्रप्रमुख एन.के गीते यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार शालेय स्तरावरती झालेले बदल, विद्यार्थ्यांना शिक्षणाकडे वळवताना याधोरणानूसार शिक्षण पध्दतीमध्ये झालेले बदल, शिकवण्याच्या पध्दतीमध्ये झालेले बदल याबद्दल माहिती दिली. या वेळी प्राचार्य विजयकुमार गर्ग यांनी २१व्या शतकातील गरजांना अनुरूप, व्यापक व लवचिक, बहुविद्याशाखीय शिक्षणाद्वारे केंद्रीय विद्यालय संघटनाने स्वीकारलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या परिवर्तनात्मक प्रभावावर प्रकाश टाकला.

केंद्रीय विद्यालयांनी नवीन शैक्षणिक संरचना (५+३+३+४) आणि NIPUN (नॅशनल इनिशिएटिव्ह फॉर प्रोफिशियन्सी इन रीडिंग इन अंडरस्टँडिंग अँड न्युमरॅसी) तसेच इंग्रजी, हिंदी आणि संख्याशास्त्रातील लर्निंग आउटकम्स सारख्या उपक्रमांचा अवलंब करून धोरणाचे प्रभावी अंमलबजावणी केली असल्याचे सांगितले.

# 'ज्युबिली'ने फोकसमध्ये आणले 'बॉम्बे टॉकिज'

> साहित्य असो, रंगभूमी असो, चित्रपट अथवा वेबसिरिज... काही वेळा जुन्या काळात डोकावायची संधी देते. चित्रपटाच्या भाषेत 'फ्लॅशबॅक'मध्ये नेते. चरित्रपटाचे तेही एक मोठं देणं आहे, पण एखाद्या विशिष्ट कालखंडावर आधारित कलाकृतीही एखाद्या जुन्या काळातील काही गोष्टींबद्दलचे कुतूहल जागे करतात. विक्रमादित्य मोटवानी दिग्दर्शित बहुचर्चित वेबसिरिज 'ज्युबिली' तेच घडतंय.

मुंबईतील पहिला चित्रपट शूटिंग स्टुडिओ म्हणून ओळखल्या जात असलेल्या मालाड येथील बॉम्बे टॉकिजची ही मालिका आठवण देतेय. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीचं त्यामुळे हे बॉम्बे टॉकिज कुठलं, त्याचं महत्त्व काय, त्यांचे हिंदी चित्रपटसृष्टीतील कॉन्ट्रीब्युशन काय याबाबतचे कुतूहल वाढलयं, तर खूप मागची पिढी या 'ज्युबिली'ने जुन्या आठवणीत रमलीय. या वेबसिरिजमधील पात्र हिमांशु रॉय, देविका राणी, अशोककुमार, दिलीपकुमार यांच्याशी बरीचशी मिळती जुळती आहेत. खरंतर ती अगदी तशीच असावीत असाच पटकथा व संवाद लेखक आणि दिग्दर्शकाचा हेतू अगदीच स्पष्ट असल्याचे जाणवते. त्यापेक्षा थेटच 'बॉम्बे टॉकिजची गोष्ट' का दाखवली नाही? मग सगळेच सत्य अथवा सत्याच्या जवळपास जाणारे दाखवायची कसोटी, कसब व कौशल्य महत्त्वाचे ठरले असते. वास्तववादी दाखवायचे तर अधिकाधिक संदर्भ, तपशील, माहिती मिळवायला हवी. ती क्रॉस चेक करायला हवी. अनेकांच्या भेटीगाठी घ्यायला हव्यात आणि हे सगळेच दाखवायचे तर परवानगी हवी. आता बॉम्बे टॉकिजच्या संदर्भातील बहुतेक पाचवी पिढी असेल, त्यांनी 'यातून बक्कळ पैसा मिळेल' अशी भावना न ठेवता एक इतिहास डिजिटल मीडियात कायमस्वरुपी राहिल असा सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करायला हवा. 'ज्युबिली'मध्ये बॉम्बे टॉकिजच्या ऐवजी रॉय टॉकिज म्हटलंय आणि जवळपास ऐंशी-नव्वद वर्षांपूर्वीचा काळ उभारलाय. अनेक व्यक्तीरेखा बॉम्बे टॉकिज संदर्भात आहेत. थीममधील नाट्यही अगदी तस्सेच आहे. अगदी चित्रपटांची नावेही मिळतीजुळती आहेत आणि मोठा ग्रामोफोन, गीत-संगीत अगदी तस्सेच आहे. बरं सगळे असे जवळपास 'डिट्टो' करायचे आणि पुन्हा वर म्हणायचे यातील व्यक्ती आणि घटना यामध्ये काही साम्य आढळल्यास तो योगायोग समजावा... काय भारी पळवाट आहे ना?

खरंतर काळाच्या ओघात मुंबईतील बरेच चित्रपट स्टुडिओ (प्रकाश, ज्योती वगैरे) नुसतेच बंद झाले असे नव्हे; तर काहींचे काहीच कसलेही अस्तित्वच नाही, पण निदान बॉम्बे टॉकिज हे बसस्टॉपपुरते का असेना पण आहे. मालाडला स्वामी विवेकानंद रोडवर म्हणजेच आजच्या पिढीतील एस.व्ही. रोडवर हा बसस्टॉप आहे. कदाचित काहींना या नावाचे येथे फारच पूर्वी सिंगल स्क्रीन थियेटर असावे असे वाटत असेलही, कारण तीही एकेक करीत बंद होत गेलीत. या विभागातील खूप जुन्या रहिवाशांना कधी काळी या नावाचा येथे स्टुडिओ असावा याची केवळ माहिती असावी. मूळ स्टुडिओच्या जागी आलेल्या इंडस्ट्रीयल इमारतीची ओळख 'बॉम्बे टॉकिज' अशी आहे. आजच्या पिढीला हे नाव असे माहीत आहे.

आपल्याकडे जुन्या काळातील चित्रपटगृहावर फारसा फोकस पडला नाही तसेच मुंबईतील खूपच जुन्या चित्रपट स्टुडिओवर एक महत्त्वपूर्ण मालिका होऊ शकेल. त्यात माहिती व मनोरंजनाचा खजिना असेल. इन्फर्मेशन आणि एन्टरटेन्मेन्ट यांची जोडणी म्हणजे इन्फोटेक. जे आजचे विलक्षण चलनी नाणे आहे. तसा बहुस्तरीय मसाला 'जुन्या काळातील चित्रपट स्टुडिओत' डोकावताना मिळेल. फिल्म मेकिंगपासून गॉसिप्सपर्यंत बहुत कुछ म्हणजे हे शूटिंगचे स्टुडिओ. मेकअप रूमपासून डबिंग थिएटरपर्यंतचा हा रोचक, रंजक, कधी आश्चर्यकारक असाच भन्नाट व भरभरून प्रवास आहे. उगाच नाही, 'ज्युबिली' वेबसिरिज जन्माला आली आणि हिटही झालीय. चित्रपट हे दृश्य माध्यम आहे म्हणूनच त्याचा इतिहासही त्याच स्वरुपात जतन करायला हवा (होता.) अजूनही ते शक्य आहे. लेखणीसह कॅमेरा कार्यरत ठेवला तर बरेच काही 'कव्हर' होईल.



बॉम्बे टॉकिज स्टुडिओने अशोककुमार, दिलीपकुमार अशा बुजुर्ग अभिनेत्यांना रूपेरी पदार्पणाची संधी दिलीय असे म्हटल्याने या स्टुडिओचे मोठेपण नक्कीच अधोरेखित होतेय. हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील ही 'चलनी नाणी'. अभिनय कसा असतो, कसा करावा याचे धडे यांचे चित्रपट पुन्हा पुन्हा पाहून शिकता येईल. हे जणू 'अभिनय संस्था' आहेत.

चित्रपट निर्माते हिमांशू रॉय व त्यांची अभिनेत्री पत्नी देविका राणी यांनी १९३४ साली मालाडला चित्रपट स्टुडिओ व लॅबोरेटरी यांची उभारणी केली. त्या काळात मुंबईची सीमा वांद्रे-सायनपर्यंत होती. ती जुन्या नकाशावरही दिसते. त्या काळानुसार ते योग्यच होते. अर्थातच मालाड मुंबईपासून खूपच दूर. शांत शांत परिसर. आपला चित्रपट नुकताच (म्हणजेच १९३२ साली) बोलू लागला होता. तोपर्यंत मूकपटांची निर्मिती होत असे. हळूहळू चित्रपट निर्मिती संस्था व त्यांचे स्टुडिओ यांची वाढ होत होती. 'जवानी की हवा' हा बॉम्बे टॉकिजचा पहिला चित्रपट होय, पण 'अछूत कन्या'च्या यशाने बॉम्बे टॉकिजला स्थैर्य व अस्तित्व मिळवून दिले. ते फारच गरजेचे असते. चित्रपटसृष्टीत 'यश हेच चलनी नाणे' आहे यात बरेच काही आले. अशोककुमार व देविका राणी यांच्या त्यात प्रमुख भूमिका होत्या. १९४० साली हिमांशू रॉय यांचे निधन झाल्यावर देविका राणी यांनी सूत्रे हाती घेतली. त्या काळात कितीही मोठा स्टार असला तरी तो 'स्टुडिओचा कर्मचारी' असे. तो काळच तसा होता. चित्रपट निर्मितीत काही परंपरा होती. कलाकार लहान असो वा मोठा त्याला मासिक पगार असे. अशोककुमारने अशा पध्दतीने बॉम्बे टॉकिजच्या 'किस्मत', 'बंधन' इत्यादी चित्रपटातून भूमिका केल्या. 'किस्मत' (१९४३) चित्रपटाचे विशेष म्हणजे आपल्याकडील चित्रपटात पहिल्यांदाच 'चोर नायक' पाहायला मिळाला. चित्रपटाच्या गोष्टी अशा बदलत होत्या. यात अशोककुमारच्या लहानपणीची भूमिका मेहमूदने साकारलीय. या चित्रपटाने कोलकात्यातील मॅजेस्टिक चित्रपटगृहात शंभरपेक्षा जास्त आठवडे मुक्काम केला. हा दीर्घकालीन विक्रम आहे. या यशाचा कायमच संदर्भ दिला जातो.

## झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

याच बॉम्बे टॉकिजने अमिया चक्रवर्ती दिग्दर्शित 'ज्वार भाटा' (१९४४) या चित्रपटाच्या निर्मितीची तयारी केली तेव्हा त्याना नवा नायक हवा होता. ती संधी दिलीपकुमारला मिळाली तरी दरम्यान अनेक गोष्टी घडल्यात. देविका राणी यांनीच युसूफ खानचा दिलीपकुमार केला. या वेळेस वासुदेव आणि जहांगीर अशीही दोन नावे होती. या तीन नावांतून दिलीपकुमार हे नाव निवडले गेले आणि या नावाचा इतिहास/प्रभाव/दबदबा आज सगळ्यांनाच माहीत आहे. दिलीपकुमारच्या मृत्यूनंतरही त्याचे चित्रपट व अभिनय यांचा प्रभाव कायम आहे.



बॉम्बे टॉकिजची असंख्य वैशिष्ट्ये आहेत. तेथील ग्रंथालयात असंख्य पुस्तके होती (चित्रपट स्टुडिओ म्हणजे केवळ शूटिंग शूटिंग नि ग्लॅमर, गॉसिप्स, फिल्मी गप्पा नाही) हा स्टुडिओ वक्तशीरपणासाठीही ओळखला जाई. (कालांतराने याच चित्रपटसृष्टीला कोणत्याच बाबतीत 'वेळेचे बंधन' राहिले नाही. एखादा अपवाद अमिताभ बच्चन) एखाद्या कलाकाराचे शूटिंग वा डबिंग नसले तरीही त्याने रोजच्या रोज सकाळी ९ वाजता यायलाच हवे हा दंडक होता. चित्रपती व्ही. शांताराम यांच्या राजकमल कलामंदिर स्टुडिओतही अशीच वेळेची शिस्त होती. स्टार तर हमखास उशिराच यायला हवा अशी जणू गरज असल्याच्या आजच्या काळात हे सगळेच वेगळेच वाटतेय ना? बॉम्बे टॉकिजचे कॅन्टीन रुचकर जेवणासाठी प्रसिद्ध होतेच, पण कलाकार, निर्माता-दिग्दर्शक, तंत्रज्ञ व कामगार एकत्र येऊन जेवत. आजच्या प्रत्येक लहान मोठा स्टार कधी लंच ब्रेक होतोय, बाहेरून मेहंगा खाना मागवतोय आणि आपल्या व्हॅनिटीत जातोय अशा काळात हे सगळेच दुर्मिळ वाटतेय ना?

दिलीपकुमारने बॉम्बे टॉकिजच्या 'ज्वार भाटा' (१९४४), 'प्रतिमा' (१९४५) व 'मिलन' (१९४६) अशा आपल्या कारकीर्दीतील पहिल्या तीन चित्रपटांत भूमिका केल्या. त्याची कलाकार व व्यक्तिमत्त्व म्हणून येथेच पाळेमुळे रूजत गेली, घट्ट होत गेली. बॉम्बे टॉकिजने 'स्टार' घडवले असेच कौतुकाने म्हणायला हवे.

बॉम्बे टॉकिजने आणखीही काही चित्रपटांची निर्मिती केलीय आणि त्यांची आणखी काही वैशिष्ट्ये आहेत. म्हटलं ना, चित्रपट शूटिंग स्टुडिओ म्हणजे फक्त चार भिंती नव्हतेच, तर ते एक वेगळे 'लाईव्ह ' जग आहे, जेथे संवेदनशीलता आणि स्वप्न आहेत. मेहनत आहे आणि अनेक बोलके चेहरे आहेत.



जुन्या काळातील प्रत्येक चित्रपट स्टुडिओची अशी बरीच खासियत आहे, पण त्याची आठवण करुन द्यावी लागतेय.

खरंतर बॉम्बे टॉकिज, आर. के. फिल्म बॅनर व स्टुडिओ यांनी उत्तमोत्तम चित्रपट दिल्याने त्यांचे 'बस स्टॉपला त्यांचे नाव असल्यानेच' त्या रूपाने त्यांचे अस्तित्व अधोरेखित होईलच, पण त्यात या वास्तूंचीही आठवण यायला हवीच...'ज्युबिली' वेबसिरिज या सगळ्याचीच पुरेपूर जाणीव करून देत आहे. आज आपण बॉम्बे टॉकिज परिसराला भेट दिल्यावर फक्त आणि फक्त जुने काही सांगाडे दिसतात. ते जुन्या वैभवाची आठवण देतात आणि त्याच वेळेस 'ज्युबिली' वेबसिरिज या सगळ्यासाठी एक निमित्त ठरते. तेही महत्त्वाचे आहे...

---

# नात्यांना रिस्टार्ट करा...

एखाद्याला आपण मॅसेज केला आणि तो मॅसेज आपल्याला आवडला नाही तर लगेच आपण तो मॅसेज डिलिट करू शकतो, परंतु एकदा डिलिट केलेला मॅसेज परत आणायचा असेल तर तो आणता येत नाही. कारण कोणतीही गोष्ट क्षणात डिलीट करता येते, पण प्रत्येक गोष्ट क्षणात परत आणता येत नाही. अगदी आपल्या नात्याचेसुद्धा असेच आहे. एकदा जोडलेले नाते तोडता येते, पण एकदा तुटलेले नाते सहजासहजी जोडता येत नाही. म्हणून आयुष्यात कोणत्याही गोष्टी डिलिट करतांना नक्की विचार करा, कारण गेलेल्या गोष्टी परत येत नसतात.

जेव्हा मोबाइल हँग व्हायला लागतो तेव्हा आपण लगेच मोबाईलला स्विच ऑफ करीत नाही तर त्याला आपण रिस्टार्ट करतो आणि मोबाईल रिस्टार्ट केला की, मोबाईल पूर्वीसारखा व्यवस्थितपणे काम करु लागतो. आपल्या नात्याचेपण असेच आहे, परंतु हल्ली नाती हँग व्हायला लागली की, मागचा पुढचा कोणताही विचार न करता सरळ सरळ नाती स्विच ऑफ केली जात आहेत आणि लक्षात ठेवा, नाती एकदा स्विच ऑफ झाली की, नाती स्विच ऑन होण्यासाठी बराच वेळ लागतो, कारण कधी कधी नाती कायमसाठीच स्विच ऑफ झालेली असतात.

कोणतीही गोष्ट क्षणात मिळत नसते मग वस्तू असो की माणसे. एखादी गोष्ट मिळवायची असेल तर त्यासाठी आपण बराच वेळ देत असतो. म्हणून आपल्या जवळ असलेल्या वस्तूंना आणि माणसांना आपल्याला जपता आले पाहिजे. कारण डिलीट करणे सोपे आहे पण मिळविणे फार कठीण आहे. म्हणून जवळच्या नात्याला सांभाळा, त्यांना समजून घ्या, नात्यामध्ये वाद-विवाद होत राहतील, पण नात्यातला संवाद संपू देऊ नका. कारण बोलल्याने अनेक प्रश्न सुटत असतात. त्यामुळे नात्यामध्ये काहीही झाले तरीही त्यातून एखादा चांगला मार्ग शोधण्याचा प्रयत्न करा. कारण एकदा रिस्टार्ट केले अनेक गोष्टी पूर्वीसारख्या होतात.

कोणतेही नाते हँग तेव्हाच होते, जेव्हा त्यात कोणते ना कोणते व्हायरस येतात. मग हे व्हायरस रागाचे असतील, लोभाचे असतील, खोटं बोलण्याचे असतील, द्वेषाचे असतील, शंकेचे असतील, अविश्वासाचे असतील किंवा अजून दुसरे कोणतेही. असे व्हायरस असतील तर नाते हमखास हँग होतातच आणि जेव्हा नाती हँग व्हायला लागतात तेव्हा आपल्याला नाते स्विच ऑफ करावेसे वाटते. पण नाते स्विच ऑफ करण्यापूर्वी नात्यात कोणते व्हायरस आले आहे ते सर्वात आधी शोधा आणि त्या व्हायरसला नष्ट करण्यासाठी स्वतः अँटीव्हायरस व्हा. कारण नाते महत्त्वाचे असते व्हायरस नाही.

आयुष्य सुंदर आहे. तेव्हा आपणही सुंदर व्हावं. सुंदर असे आयुष्य सुंदरपणे जगावं. चेहऱ्याने सुंदर नसेल तरीही मनाने सुंदर असावं. वाद झालेत तरीही आपल्या माणसांना आपणच जपावं, चुकले कधी आपले तर एक पाऊल मागेही घ्यावं, मीपणा आडवा येत असेल तर मोठे मन करून कमीपणा स्वीकारावं, गोड बोलण्यापेक्षा खरं बोलावं आणि आपल्याला माणसांना आपणच समजून घ्यावं. कारण आयुष्याच्या प्रवासात अनेक गोष्टी भेटतात. पण एकदा तुटलेली माणसे पुन्हा भेटत नाही. म्हणून नात्याला डिलीट नाही तर रिस्टार्ट करा...

**-सुरज दहागावकर, चंद्रपूर**



---

# मानवी तस्करी रोखण्याचे आव्हान



(संग्रहित छायाचित्र)

आज देशात समस्यांचा महापूर मोठ्या प्रमाणावर आहे. झपाट्याने वाढणारी महागाई, बेकारी, आर्थिक विषमता, गरिबी, भूक, कुपोषण, रोगराई, प्रदूषण, भेसळ, संस्कृतीहीन वागणूक, डॉलरच्या तुलनेत रुपयाची सातत्याने घसरण, देशावरील वाढते कर्जाचे डोंगर, गुन्हेगारीचा वाढता ग्राफ, भ्रष्टाचार, नैसर्गिक साधन संपत्तीचे अतिवापर अशा अनेक समस्या समाजाला पोकळी निर्माण करत आहेत. अशा समस्या नवीन समस्यांना जन्म देतात, त्यापैकी 'मानवी तस्करी' ही मुख्य समस्या आहे. मानवी तस्करी जगभर मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. मानवी तस्करी करून प्राण्यांपेक्षाही भयंकर नरकयातना देऊन निष्पाप जिवांना गुलाम बनवून अमानुष वागणूक दिली जाते. पुरुष, महिला आणि सर्व वयोगटातील कोणत्याही पार्श्वभूमीतील मुले या गुह्याला बळी पडू शकतात.

मानवी तस्करी रोखण्याचे मोठे आव्हान जगभरातील तपास यंत्रणांसोबतच भारतातील संबंधित संस्थांपुढेही उभे ठाकले आहे. अमलीपदार्थ आणि शस्त्रास्त्रांनंतर मानवी तस्करी हा आज जगातील तिसरा मोठा व्यापार झाला आहे.

दिल्ली म्हणजे देशातील मानवी तस्करीचा हब आहेच, पण या अवैध व्यापाराचा आशियातील केंद्रबिंदूही आहे. घरकामासाठी तरुण मुलींचा अवैध व्यापार, बळजबरी विवाह आणि वेश्या व्यवसायाचा हा हॉटस्पॉट मानल्या जातो. दिल्ली पाठोपाठ मुंबईचा नंबर लागतो. सद्यस्थितीत देशाच्या प्रत्येक भागात मानवी तस्करीचे हे जाळे घट्ट होत चालले आहे. असे असले तरी गुन्हेगारीच्या या जगाबाबत जनमानसात अजूनही फारशी जागरुकता नाही.

बेकायदेशीररित्या लोकांना परदेशाच्या हद्दीत पोहचविणे म्हणजे मानवी तस्करी इतकाच समज अनेकांनी करून घेतला आहे, परंतु गुन्हेगारीचे हे विश्व केवळ एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. तर याचे अनेक पैलु आहेत. बळजबरीने वेश्या व्यवसाय करवून घेणे, वेठबिगारी, गुलामी, भीक मागण्यास बाध्य करणे, गुन्हेगारी कारवायांमध्ये वापर, घरेलु गुलामी, बळजबरीने लग्न असे एकना अनेक उद्देश या मानवी तस्करीत दडलेले आहेत. भारताचा विचार केल्यास अलिकडच्या काही काळात लहान मुलं आणि महिलांच्या तस्करीत लक्षणीय वाढ झाली आहे. महाराष्ट्रात मुंबई, पुणे आणि ठाणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर आदी शहरांमध्ये याचे प्रमाण मोठे असल्याचे नॅशनल क्राईम ब्युरोने वेळोवेळी जाहीर केलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. चाईल्ड पोर्नोग्राफी, वेश्याव्यवसाय यासाठी या मुलामुलींचा अतोनात छळ केला जातो. यासाठी केवळ देशांतर्गतच नव्हे तर बांगलादेश, कझागिस्तान, रशिया, नेपाळ, उझबेकिस्तान, मलेशिया, थायलंड यासारख्या देशातून तस्करी केली जाते. वेगवेगळी कारणे पुढे करून फसवणुकीद्वारे मुलामुलींना देशात आणले जात असल्याने बऱ्याच वेळेला हे प्रकार उघडकीसच येत नाही.

२०१८ साली युनायटेड नेशन्स ऑफिस ऑफ ड्रग्ज ॲण्ड क्राईम ग्लोबलने एक अहवाल जाहीर केला होता. त्यानुसार लैंगिक शोषणासाठी तस्करी करण्यात आलेल्यांमध्ये महिलांची संख्या सर्वांत जास्त होती. बळजबरी मजुरीच्या हेतूने झालेल्या तस्करीत महिला आणि मुलींचे प्रमाण ३५ टक्के एवढे होते. लोकांची मानसिकता बदललेली नाही. श्रम आणि लैंगिक शोषण थांबलेले नाही. उलट वाढते आहे. वेठबिगारी कामगारांची प्रथा बंद झालेली नाही. स्वयंसेवी संघटनांच्या सांगण्यावर विश्वास ठेवला तर या देशात मानवी तस्करीतील पीडितांची संख्या जवळपास ८० लाखांच्या घरात आहे आणि यातील बहुसंख्य वेठबिगारी कामगार आहेत. यासंदर्भात जनजागृतीच्या उद्देशानेच दरवर्षी ३० जुलैला हा मानव तस्करीविरोधी दिन पाळला जातो.

वाढती मानवी तस्करी हा देशापुढील गंभीर प्रश्न झाला आहे. नेमकी किती मुलं किंवा महिला तस्करीच्या बळी ठरल्या याबाबतची ठोस आकडेवारी काढणारे कुठलेही अध्ययन आजवर झालेले नाही. इंटरनेटसारख्या अत्याधुनिक साधनांमुळे मानवी तस्करी गरीब, श्रीमंत अशा प्रत्येक कुटुंबाच्या उंबरठ्यावर पोहचली आहे. प्रामुख्याने छोट्या शहरांमधून हजारो गरीब महिला आणि मुलांना दरवर्षी चांगली नोकरी, पैशाची लालूच दाखवून महानगरांमध्ये आणले जाते. तेथे त्यांचे सौदे केले जातात. यापैकी काहींना घरकामास जुंपले जाते तर काहींना मजुरीत. अनेक महिलांना बळजबरीने देहविक्रीच्या धंद्यात लोटले जाते. अनेकदा त्यांच्याकडून वेठबिगाराप्रमाणे कामे करून घेतली जातात अन् केलेल्या कष्टाचा योग्य मोबदलाही मिळत नाही. ग्रामीण आणि शहरी भागातही शिक्षणाचा अभाव, गरिबी, लहान वयात येणारी कौटुंबिक जबाबदारी आणि इतरही काही कारणांमुळे या महिला एजंटांच्या जाळ्यात अडकतात. एकदा विदेशात गेल्या की मायदेशी परतण्याचा त्यांचा मार्ग जवळपास बंद झालेला असतो.

सामाजिक संस्थांनी आवाज बुलंद केल्यानंतर आता मानवी तस्करीविरुद्ध सरकार सक्रिय झाले आहे. मानवी तस्करीविरोधात कठोर कायदा करण्याच्या दिशेने पावले उचलण्यात येत आहेत. याशिवाय पीडितांच्या पुनर्वसनासाठी योजना, आश्रयस्थाने, रोजगाराचे प्रयत्न होत आहेत. असे असले तरी ही लढाई निव्वळ सरकार आणि सामाजिक संस्थांची नाही. तर लोकांचीही आहे. आणि यासाठी आपल्यापैकी प्रत्येकानेच सतर्क व्हावे लागणार आहे.

**(साभार : इंटरनेट)**

## निवडक

### महाडमध्ये एकाची आत्महत्या

**महाड :** तालुक्यातील सोमजाई नगर नागलवाडी येथे एका इसमाने दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. ही शुक्रवारी (दि. २८) दुपारी ३.३० वाजण्याच्या पूर्वी घडली आहे. संतोष गणपत होटे (वय ४५, रा. दासगाव) हे महाड तालुक्यातील नागलवाडी येथील सोमजाई नगर येथे महादेव सुतार यांच्या खोलीत भाड्याने राहत होते. हाटे यांना दारूचे व्यसन होता. त्यांनी दारुच्या नशेत शुक्रवारी दारुच्या नशेत राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी मृत्यूची नोंद महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**माणगाव : युवा नेते निलेश थोरे यांनी राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे, पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर, माजी सभापती संगीता बक्कम, उपसरपंच स्वप्नील सकपाळ, ग्रामपंचायत सदस्या श्रद्धा यादव, राजेंद्र जाधव, प्रशांत मोरे, सुधाकर खडतर, संजय खडतर आदी उपस्थित होते.** (छाया : सलीम शेख)

# कॅशलेस प्रवासासाठी रायगडातील लाल परी सज्ज

## आठ आगारांसाठी दीड हजार मशीन उपलब्ध

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी अशी ओळख असलेली एसटी देखील दिवसेंदिवस स्मार्ट होत चालली आहे. प्रवासाचे नेमके सुटे पैसे द्या, अशी सूचना आपण एसटी बसमध्ये पाहतो, परंतु आता एसटीतून प्रवास करताना सुटे पैसे खिशात ठेवण्याची गरज नाही. तिकीट काढण्यासाठी आता पैसे देण्याऐवजी कॅशलेस व्यवहार करता येणार आहे. एसटी महामंडळाच्या रायगड विभागाकडे त्यासाठी सुमारे दीड हजार अद्ययावत तिकीट मशीन उपलब्ध झाल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात अलिबाग व पेण आगारातील वाहकांकडें या नवीन मशीन देण्यात आल्या असून, या मशीनमार्फत तिकीट देण्याचे कामदेखील सुरू करण्यात आले आहे. उर्वरीत सहा आगारांना लवकरच या मशिन्स उपलब्ध करून दिल्या जातील. क्युआर कोड अथवा एटीएममार्फत ऑनलाईन पद्धतीने तिकिटाचे पैसे देऊन तिकीट घेता येणार आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांत रायगड विभागात ही यंत्रणा १०० टक्के राबवली जाणार असल्याची माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.



रोखीत व्यवहारापेक्षा कॅशलेस व्यवहाराला अलीकडे अधिक पसंती मिळते आहे. एका क्लीकवर आर्थिक व्यवहार करण्याची पद्धत वाढू लागली आहे. कॅशलेसची वाढती मागणी ओळखून एसटी महामंडळदेखील याच पद्धतीने हायटेक होण्याच्या मार्गावर आहे. पूर्वी तिकीट देण्यासाठी रोख रक्कम प्रवाशांकडून घ्यावी लागत होती. त्यामुळे अनेक वेळा सुट्टे पैशांवरून वाहक व प्रवाशांसोबत शाब्दीक वाद होत असल्याच्या घटना घडत आहे. हा प्रश्न आता लवकरच कायमचा सुटणार आहे. एसटी महामंडळामार्फत प्रवाशांशी कॅशलेस व्यवहार केला जाणार आहे. त्यासाठी एसटी महामंडळ रायगड विभागाकडे तिकीट काढण्याची अद्ययावत मशीन दाखल झाली आहेत. ही मशीन स्क्रीन टच असून, दोन ते तीन दिवस चालणारी बॅटरी आहे. या मशीनमध्ये जीपीएस प्रणाली असून, एटीएम कार्ड किंवा क्यु आर कोडच्या माध्यमातून पैसे अदा करण्याची व्यवस्था आहे.

ही मशीन अपडेट होण्यासाठी दोन ते तीन महिने लागणार आहेत. आगारांमध्ये नवीन संगणक बसवल्यावर ही प्रक्रिया लवकरच सुरु केली जाणार असल्याची माहिती अलिबाग आगार व्यवस्थापक अजय वनारसे यांनी दिली.

**कॅशलेस मशीन घेण्याचा पहिला मान मला मिळाला, मशीन हाताळण्यास सोपी असून, कामही वेगात होत आहे. टच स्क्रीन मशीन असल्याने कामाचा वेगही वाढण्यास मदत होत आहे. ही मशीन अद्ययावत असून, बॅटरी बॅकअपही चांगला आहे.**

**–शिल्पा सुळे,** वाहक, अलिबाग

**दीड हजारमशीन रायगड जिल्ह्याला प्राप्त झाल्या आहेत. अलिबाग व पेण येथे मशीनचा वापर पहिल्या टप्प्यात सुरु केला आहे. मशीन अपडेट करण्याचे काम सुरू असून, त्यासाठी लागणारे स्थानकातील संगणक आदी साहित्य पुरवण्याचे काम सुरू आहे.**

**–दीपक घोडे,** विभाग नियंत्रक, रायगड विभाग

**विभाग कार्यालयालयाकडून तिकीट काढण्याच्या १४० नवीन मशीन देण्यात आल्या आहेत. या मशीन वापरण्यास सुरुवात केली आहे. नवीन मशीन अपडेट केल्यावर कॅशलेस प्रक्रिया राबवली जाणार आहे. रोकडऐवजी क्यूआर कोड अथवा एटीएम कार्डमार्फत आर्थिक व्यवहार होणार आहेत.**

**–अजय वनारसे,** आगार व्यवस्थापक, अलिबाग

# रेवदंड्यात शिक्षकाचे विद्यार्थिनीशी गैरवर्तन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

खाजगी ट्यूशन क्लासमध्ये अल्पवयीन विद्यार्थीनीशी गैरवर्तन करणाऱ्या शिक्षकाला ग्रामस्थांनी चोप देऊन रेवदंडा पोलिसांच्या ताब्यात दिले. अल्पवयीन विद्यार्थीनीशी गैरवर्तन करणाऱ्या त्या शिक्षकाला रेवदंडा पोलिसांनी अटक करून गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, रेवदंडा बाजारपेठेत हमरस्ताला लागूनच असलेल्या एक मजली इमारतीत भाड्याच्या खोलीत ४० वर्षीय दशरथ छगन गोसावी हे कला शिक्षक खासगी ट्यूशन क्लास चालवितात. परिसरातील तीन अल्पवयीन विद्यार्थिनींना २८ जुलै रोजी सायकांळी ६ ते ८ वाजणेच्या दरम्यान, या खासगी ट्यूशन क्लासमध्ये हे शिक्षक शिकवीत असताना, त्यातील एका बारा वर्षीय इयत्ता आठवी इयत्तेतील विद्यार्थिनीच्या शरिराशी गैरवर्तन केले. याबाबत हा प्रकार अल्पवयीन मुलींने आई वडिलांना सांगितले. त्वरीत तेथील स्थानिक ग्रामस्थांनी आई वडिला समवेत जाऊन चैतन्य अपार्टमेंट येथील रूममध्ये शिक्षकांस जाब विचारला.

**ग्रामस्थांनी दिला चोप**

या वेळी उपस्थित ग्रामस्थांनी या शिक्षकांस चांगलाच चोप दिला व पिडीताचे आईने याबाबत रेवदंडा पोलीस ठाणेकडे तक्रार नोंदविली. चाळीस वर्षीय दशरथ छगन गोसावी हे शिक्षक सातारा जिल्हातील पाटण येथील आहेत, सध्या रेवदंडा येथील इमारतीच्या रूममध्ये राहत असून परिसरातील शाळेत कला शिक्षक म्हणूक कार्यरत आहेत.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे अल्पवयीन विद्यार्थीनीच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार या शिक्षकाच्याविरोधात भादविकलम ३५४ सह लैगिक अपराधापासून बालकांचे सरक्षंण अधिनियम २०१२चे कलम ८,१०,१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक राहुल अतिग्रे हे करत आहेत.

विविध शासकीय व निमशासकीय शाळामध्ये नोकरीस असताना, अनेक शिक्षकवर्ग खासगी क्लासेस घेत आहेत, याबाबत समस्त नागरिक संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत. खासगी ट्यूशन क्लासेसमध्ये घडलेल्या या गैरप्रकाराने परिसरातील पालकवर्गाचे धाबे दणाणले असून खासगी ट्यूशन क्लासेस बद्दल पालकवर्गामध्ये शंका उपस्थित होवू लागल्या आहेत.

# रायगडसाठी मुंबई विद्यापीठाचे स्वतंत्र उपकेंद्र सुरू करण्याची मागणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यासाठी मुंबई विद्यापीठाचे स्वतंत्र उपकेंद्र सुरू करण्यात यावे, अशी मागणी मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य वैभव थोरात व युवा सेना कॉलेज कक्ष सचिव ओमकार चव्हाण यांनी मुख्यमंत्र्याकडे पत्राद्वारे केली आहे.

जागतिक पातळीवर मुंबई विद्यापीठाचा दबदबा आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचा मुंबई विद्यापीठामध्ये शिक्षण घेण्याकडे कल असतो. मुंबई विद्यापीठाशी मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील जवळपास ९०० पेक्षा अधिक महाविद्यालये संलग्न आहेत. विद्यार्थ्यांना कोणत्याही कामासाठी मुंबईमध्ये यावे लागू नये यासाठी मुंबई व उपनगर या जिल्ह्यांना वगळता प्रत्येक जिल्ह्यामध्ये मुंबई विद्यापीठाकडून उपकेंद्र सुरू केले आहे. ठाणे, पालघर, रत्नागिरी व सिधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक उपकेंद्र आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना कोणतीही शैक्षणिक अडचण निर्माण झाल्यास त्यांना या उपकेंद्रावर मदत उपलब्ध होते, मात्र रायगड जिल्ह्यामध्ये एकही उपकेंद्र अद्यापपर्यंत सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे या जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना मुंबईला यावे लागते.

रायगड जिल्ह्यातील बहुतांश भाग हा दुर्गम असल्याने येथील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयात येण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. महाड, पोलादपूर, माणगाव, अलिबाग येथील विद्यार्थ्यांना तीन ते चार तास एसटीचा प्रवास करून मुंबईत यावे लागते. मुंबई येण्यासाठी या भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक फटकाही सहन करावा लागतो. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी व त्यांना जिल्ह्यातच शैक्षणिक मदत मिळावी यासाठी रायगड जिल्ह्यातील पनवेल किंवा पेण या भागामध्ये एक उपकेंद्र सुरू करण्यात यावे.

या विनंतीचा जाणीवपूर्वक विचार करून तातडीने उपकेंद्र सुरू करण्याची प्रक्रिया राबवावी, अशी मागणी मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य वैभव थोरात व युवा सेना कॉलेज कक्ष सचिव ओमकार चव्हाण यांनी मुख्यमंत्र्याकडे पत्राद्वारे केली.

# रेवदंड्यात आज विकासकामांचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नातून तिन कोटी रूपये निधीची विकास कामे रेवदंडा ग्रामपंचायत अंतर्गत होत असून या कामाचा भुमिपुजन सोहळा कार्यक्रम रविवारी (दि. ३०) सायकांळी चार वाजता भंडारी समाज हॉल मोठे बंदर येथे संपन्न होणार आहे.

या भुमिपुजन सोहळा कार्यक्रमास शिवसेना शिंदे गटाचे अलिबाग–मुरूड–रोहा मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी व शिवसेना जिल्हा प्रमुख राजा केणी, अलिबाग तालुका शिवसेना प्रमुख प्रफुल्ल मोरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शेकापक्षाच्या बालेकिल्लुला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीत मागील विधानसभा निवडणूकीत आमदार महेंद्र दळवी यांना मोठे मताधिक्य मिळवून दिले होते. रेवदंडा–थेरोंडकरांच्या प्रेमाची जाण ठेवत आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीत तब्बल तिन कोटीची विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत.

आमदार महेंद्र दळवी यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बाहय रस्ते विकास योजने अंतर्गत रेवदंडा किल्ला अंतर्गत रस्ता तयार करणे १५ लाख रूपये, लांबाते गल्ली ते सरदार गल्ली पर्यंत रस्ता तयार करणे १५ लाख रूपये, मौजे रेवदंडा अंतर्गत रस्ता तयार करणे १५ लाख रूपये, रेवदंडा हायस्कुल ते समुद्र किनारा रस्ता साकवसह तयार करणे १५ लाख रूपये, रेवदंडा गोळा स्टॉप ते यशवंत पिटनाईक यांचे घरापर्यंत रस्ता तयार करणे, रेवदंडा सुतार आळी क्रॉकिट रस्ता तयार करणे व गटार बांधणे १५ लाख रूपये, रेवदंडा बहिरी आळी क्रॉकिट रस्ता तयार करणे व गटार बांधणे१५ लाख रूपये, रेवदंडा येथे अद्यावत मच्छीमार्केट बांधणे १५ लाख रूपये, थेरोंडा पानसेवाडी ते अळुकर वाडी पर्यंत रस्ता तयार करणे १५ लाख रूपये, थेरोंडा आप्पा अंबुकर चौक ते ज्ञानेश्वर टिवळेकर यांचे घरापर्यंत रस्ता तयार करणे १५ लाख रूपये, थेरोंडा खंडेरावपाडा अंतर्गत रस्ता तयार करणे१५ लाख रूपये, आंग्रेनगर रस्ता तयार करणे१५ लाख रूपये, रेवदंडा अंतर्गत रस्ता तयार करणे १५ लाख रूपये, थेरोंडा आगलेची वाडी येथे सामाजीक सभागृह बांधणे २५ लाख रूपये, रेवदंडा मुस्लिम समाज पागार मोहल्ला समाज सभागृह बांधणे, रेवदंडा मोठे बंदर भंडारी समाज सामाजीक सभागृह बांधणे ४० लाख रूपये विकास कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

रेवदंड्यातील शिंदे गट शिवसेना व आमदार महेंद्र दळवी समर्थत शिवसेना अलिबाग तालुका अध्यक्ष प्रफुल्ल मोरे, यांचेसह रेवदंडा शहर अध्यक्ष योगेश पिटनाईक, शहर उपाध्यक्ष विजय हाडकर, सेक्रेटरी समीर आठवले, खजिनदार केदार खोत, तसेच सदस्य मन्सुर तांडेल, चंद्रकांत दांडेकर, विवेक दांडेकर, शैलश गोंधळी यांनी हा भुमिपुजन सोहळा कार्यक्रम मोठा दिमाखदारपणे पार पाडण्याचे निश्चित केले असून रेवदंडा भंडारी समाज हॉल सभागृहात मोठी गर्दी होईल, असे म्हटले जात आहे.

# शेतकऱ्यांना पीक स्पर्धेत सहभागाचे आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

आज प्रत्येकांचे आयुष्य हे स्पर्धाने भरले आहे. प्रत्येक वेळी आपल्याला संघर्ष करून जगावे लागते. शेतामध्ये भात पेरणी, लागवड ते कापणीपासून लवकर पुर्ण व्हावी यासाठीसुद्धा जणू शेतकरी स्पर्धाच करावी लागते. पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग कृषि खात्याच्या माध्यमातून केले जाते यामुळे उत्पादकतेत वाढ करण्यासाठी तालुका, सह जिल्हा, राज्यस्तरीय ही पिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, ३१ ऑगस्टपर्यंत पिक स्पर्धेत सहभागी होण्यांचे आवाहन तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांनी केले.

याचबरोबर पावसामुळे शेतीचे नुकसान झाल्यांस शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई मिळू शकते यासाठी पिक विमा काढणे अनिवार्य असून त्यांची मुदत ३१ जुलैपर्यंत आहे. असल्यामुळे कृषि अधिकारी यांनी सांगितले आहे. पिक स्पर्धा आयोजन करण्यामागे एकच उद्दिष्टे की, राज्यामध्ये अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल.

यामध्ये तालुका स्तरीय पहिले बक्षीस ५०००, दुसरे बक्षीस ३००० रुपये, तिसरे बक्षीस २००० रुपये तसेच जिल्हास्तरीय पहिले १०,००० दुसरे ७००० तिसरे ५००० तसेच राज्यस्तरीय पहिले बक्षीस ५०,००० दुसरे ४०,००० तिसरे ३०,००० अशी वर्गवारी करण्यात आल्यांचे, कृषी पर्यवेक्षक चौक नितीन महाडिक यांनी प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.

खरीप हंगाम सन २०२३ पिकस्पर्धेसाठी तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवानी सहभाग घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी, खालापूर सुनील निंबाळकर यांनी केले आहे.

# कोयना प्रकल्पग्रस्तांचे उपोषण अखेर मागे

## आमदार महेंद्र थोरवे यांची यशस्वी मध्यस्थी

**चौक : बातमीदार**

विधानसभा अधिवेशन काळात कोयना प्रकल्पग्रस्त जनतेने मुंबई आझाद मैदान येथे सुरू केलेले उपोषण आमदार महेंद्र थोरवे यांच्या मध्यस्थीने व मुख्यमंत्री यांनी शिष्टमंडळाला दिलेल्या आश्वासनाने आमरण उपोषण सोडले.

६४ वर्षानंतरदेखील कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या नागरी सुविधा, त्यांच्या अडीअडचणी, पर्यायी जमीन न मिळाल्याने कोयना प्रकल्पग्रस्त जनतेने विधानसभा अधिवेशन काळात कोयना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी मुंबई आझाद मैदान येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला वाढता पाठिंबा मिळत असल्याने त्याची दखल कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी त्यांच्या दालनात भेट घेऊन चर्चा केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येत्या आठवड्यात कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी बैठक आयोजित करत असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांना शब्द दिला. त्या प्रमाणे मुख्यमंत्री यांचे अपर सचिव भुषण गगराणी यांनी लेखी पत्र दिल्याने कोयना प्रकल्पग्रस्त जनतेने सुरू केलेले आमरण उपोषण स्थगित करण्यात आल्याचे जाहीर केले.

आमदार महेंद्र थोरवे व आमदार प्रशांत ठाकूर यांनी याबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित केला आहे. येत्या काळात बैठक न झाल्यास आपण १५ ऑगस्ट २०२३ पासून कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या मदतीसाठी स्वतः आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. आमदार महेंद्र थोरवे हे कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या नागरी सुविधा व पर्यायी जमीन वाटपा बाबत पाठपुरावा करीत आहेत.

कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या मदतीसाठी धावणारा व गरीबांना न्याय देणारे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेंद्र थोरवे यांचे आभार व्यक्त करण्यात आले. अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाचे आनंद मरागजे, अध्यक्ष विठ्ठल मोरे, सरचिटणीस लक्ष्मण जाधव, पवन कदम, मारुती देवरे, जितेंद्र सकपाळ, एम. डी. चाळके, किसन जाधव, सतीश जाधव यांच्यासह अनेक कोयना प्रकल्पग्रस्त शेतकरी उपस्थित होते.




# प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात प्रधानमंत्री सन्मान निधी वितरण सोहळ्याचे प्रक्षेपण



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राजस्थानातील सिकर येथे प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १४वा हप्ता शेतकऱ्यांना वितरित करण्याच्या सोहळ्याचे शेतकऱ्यांसाठी थेट प्रक्षेपण कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राने वनस्पती रोगशास्त्र विभागात आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी संशोधन संचालक डॉ. एस. बी. भगत होते.

जोरदार पाऊस असतानाही ४८ शेतकरी, शास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांनी यात सहभाग नोंदविला. त्यात प्रामुख्याने हभप राणे महाराज, निरुपणकार जयदास मुने, कानसा–वारणा फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक पाटील, सुनील गोगटे, दीपक बेहेरे, अशोक ओसवाल, रमेश मुंढे, श्रीकांत सहस्त्रबुद्धे, भरत बेडेकर, तानाजी बडेकर, प्रभाकर बडेकर यांचा समावेश होता. उपस्थितांचे आभार विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी मानले.

**LOST**

I PRIYANSHU BINOD CHOUDHARY residing at RB 2, B5 at Takka, Railway Colony, Panvel, declare that my original transfer certificate for 12th of Kendriya Vidyalaya Sangathan - ONGC Panvel, Mumbai region has been lost at panvel. Sr.No- 303617. FIR is registered at panvel city police station Reg. no :1518 / 2023, dt. 27.7.23. This advertisement is release for getting a duplicate certificate from sangathan.

**PRIYANSHU BINOD CHOUDHARY - 9326438874**

## निवडक

### भाजप पदाधिकाऱ्यांची इर्शाळवाडीला मदत



**नवी मुंबई :** भाजपच्या महिला मोर्चाच्या अध्यक्षा दुर्गा ढोक आणि युवती अध्यक्षा सुहासिनी नायडू यांच्या पुढाकाराने रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथील दुर्घटनाग्रस्त भागातील नागरिकांना मदतीचा देण्यात आला आहे. भाजपच्या प्रमुख महिला पदाधिकारी उपाध्यक्षा विजया घरत, महामंत्री उज्वला जगताप, महामंत्री कल्पना छत्रे, छाया खटकर, अधन्या गव्हाणे, वळवयकर, मंडळ अध्यक्षा शितल भोईर, सुवर्णा हॉस्मानी, कोमल खिलारी यांच्या माध्यमातून येथील नागरिकांना ब्लॅकेट, चटाई, साडी, पुरुषांना कपडे तसेच खाद्यपदार्थ, घरगृती साहित्य, महिल पुरुष व लहान मुलांना चप्पला आदी साहित्य खालापूर येथे जाऊन देण्यात आले. या वेळी डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, रामचंद्र घरत, सुवर्णा होस्मानी यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### व्यापारी असोसिएशनची चारधाम यात्रा

**उरण** : बाजारपेठेतील हार्डवेअर व्यापारी असोसिएशनची यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ अशी चारधाम यात्रा अध्यक्ष पुरोषोत्तम सेवक यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली. असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी यात्रेचा लाभ घेतला. पारंपरिक वेशभूषा करून दर्शनाचा लाभ घेतला. त्यात पुरोषोत्तम सेवक, रतनलाल गुर्जर, मांगीलाल गुर्जर, किशनलाल गुर्जर, जगदीश सेवक, भारत सेवक, लक्ष्मण सेवक, लालू भाई, राजेश रवी, अर्जून रवी आदींचा सहयोग होता.



# नवी मुंबईत संसर्गजन्य आजार नियंत्रणात

## महापालिका क्षेत्रात प्रभावी उपाययोजना

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या प्रभावी उपाययोजनामुळे हे संसर्गजन्य आजार नियंत्रणात असल्याचे दिसून येत आहे.

जून महिन्यामध्ये पावसाळ्याला सुरुवात होताच वातावरणातील बदलामुळे विविध प्रकारचे आजार डोके वर काढू लागतात. मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यानंतर जून महिन्यामध्ये पावसाळी थंड वातावरणाचा परिणाम प्रकृती त्वरित स्वीकारत नाही. परिणामी, आजारांना आमंत्रण मिळते. त्यातच भरीस भर म्हणून पावसाळ्यात पिण्याचे पाणी गढूळ होते. हे पाणी धरणामधून फिल्टर करून नागरिकांना पुरवले जात असले, तरी ते काही प्रमाणात गढूळ असतेच, त्यामुळे हे पाणी पिण्यास हानिकारक नसले तरी ते उकळून गाळून पिण्यासाठी घ्यावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या माध्यमातून वारंवार केले जाते, मात्र जनतेकडून याविषयी दुर्लक्ष केले जाते. परिणामी दूषित पाण्यामुळे होणाऱ्या गस्ट्रो आदी आजाराच्या रुग्णांची संख्या जून आणि जुलै महिन्यात एकूण ३४ इतकी झाली आहे. शहरात महिनाभरापासून संततधार,तर कधी मुसळधार पाऊस पडत असल्याने वातावरणात मोठ्या प्रमाणात पालट झाला आहे. त्यामुळे नेहमी प्रमाणे मलेरिया, डेंगू, गॅस्ट्रो, टायफर्ड या संसर्गजन्य आजारांचे रुग्ण आढळून येत आहेत.

शहरातील खासगी रुग्णालये, दवाखाने, सरकारी रुग्णालय यामध्ये येणाऱ्या रुग्णांचा अहवाल नियमितपणे बहुउद्देशीय आरोग्य सेवकांच्या मार्फत संकलित केला जातो. त्यानुसार या दोन महिन्यांमध्ये विविध रुग्णालयांमधून केलेल्या रक्त नमुने तपासणीत मलेरियाचे १८, संशयित डेंग्यू रुग्ण २९८ आढळून आले त्यांपैकी दोन रुग्ण डेंग्यू पॉझिटिव्ह मिळाले. या रुग्णांवर यशस्वी उपचार करून ते बरे झाले आहेत. त्याच बरोबर टायफर्डचे २०, डायरियाचे ५, लेप्टोचा एक रुग्ण आढळून आला आहे.

डास चावल्याने होणाऱ्या डेंग्यू, मलेरिया आदी संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी घरांतर्गत डास उत्पत्तीची स्थाने शोधून ती नष्ट करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. यामध्ये जुलै महिन्यात दोन लाख २४ हजार २९ घरांची पहाणी करण्यात आली. या वेळी चार लाख १३ हजार ८८८ डास उत्पत्तीची स्थाने तपासण्यात आली. त्यामध्ये एक हजार ४८२ उत्पत्ती स्थाने आढळून आली असून त्यांची उत्पत्ती स्थाने प्रक्रिया करून त्वरित नष्ट करण्यात आली असल्याचे नवी मुंबई मनपा मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांनी सांगितले.

### वर्षभर डास निर्मूलन मोहीम

*वर्षभर डास निर्मूलन मोहीम राबवली जाते. यामध्ये सार्वजनिक ठिकाणची डास उत्पत्ती स्थाने शोधून ती नष्ट केली जातात. यासाठी गटारात धूर फवारणी, ऑईल टाकणे ही प्रक्रिया केली जाते. पावसाळ्यात दूषित पाणी पुरवठा होऊ नये यासाठी शहर अभियंता विभागाच्या वतीने जलशुद्धीरण प्रकल्प प्रभावीपणे कार्यरत ठवले जातात. जलवाहिन्यांमध्ये दूषित पाणी मिसळणार नाही यासाठी गळतीच्या ठिकाणी पावसाळ्यापूर्वी देखभाल दुरुस्ती केली असल्याचे डॉ. प्रशांत जवादे यांनी सांगितले.*

### अॅड. राम नाक्ती यांना डी.लिट पदवी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील अॅड. राम विनायक नाक्ती यांना वेस्टर्न अमेरिकन युनिव्हर्सिटीतर्फे ह्युमन राईट्समध्ये डी.लिट (डॉक्टरेट) ही पदवी बहाल करण्यात आली आहे.

केरळमधील पोंडिचेरी येथे नुकताच झालेल्या पदवीदान समारंभात राम नाक्ती यांना ह्युमन राईट्समध्ये डॉक्टरेट (डी.लिट) ही पदवी बहाल करण्यात आली आहे. भारतातील विविध राज्यांतून फक्त ३८ जणांना ही पदवी बहाल करण्यात आली. पनवेलसह रायगडमधील विविध स्तरांतून त्यांचेवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# नवी मुंबईतील आपत्कालीन यंत्रणा दक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

१७ जुलैपासून मोठ्या प्रमाणात सुरू झालेल्या पावसाने जराही उसंत घेतली नसून २८ जुलैपर्यंत मागील १२ दिवसांत नमुंमपा क्षेत्रात तब्बल ८१४.९९ मिमी. पर्जन्यवृष्टी झाली आहे. अतिवृष्टीमुळे नागरिकांची कोणत्याही प्रकारची अडचण होऊ नये याकरिता महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांचे परिस्थितीवर अत्यंत बारकाईने लक्ष असून संपूर्ण आपत्ती निवारण यंत्रणा दक्षतेने कार्यरत आहे.



एखादी तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्याचे निराकरण होऊन काम झाल्यानंतरची छायाचित्रे प्राप्त होईपर्यंत आढावा घेतला जात असल्याने संपूर्ण यंत्रणा सतर्क राहून क्षेत्रीय स्थानांवर दक्षतेने काम करीत आहे. नवी मुंबई हे शहर समुद्र सपाटीपासून खालच्या पातळीवर वसलेले असल्याने मोठया भरतीच्या काळात अतिवृष्टी झाल्यास शहरातील काही सखल भागात पाणी साचते. अशी १४ ठिकाणे महानगरपालिकेमार्फत निश्चित करण्यात आली असून त्याठिकाणी पुरेशा प्रमाणात पाणी उपसा पंपांची व्यवस्था करण्यात येते. तसे स्पष्ट निर्देश आयुक्तांमार्फत यापूर्वीच देण्यात आले आहेत व अतिवृष्टीच्या काळात या ठिकाणांवरील परिस्थितीचा व मदतकार्य कार्यवाहीचा आढावाही घेतला जात आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १०८ किमी. रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. एमआयडीसी क्षेत्रात १५ किमी. रस्त्यांचे काँक्रिटीकरण नवी मुंबई महापालिकेने केले आहे व आर ब्लॉकमधील २१ किमी. रस्त्यांचे काम सुरू आहे. एमआयडीसीमार्फत १५ कि.मी. रस्त्यांचे काम सुरु असून त्याठिकाणी गटाराची व्यवस्था नसल्याने काम सुरु असलेल्या काही भागात पाणी साचत असल्याचे निदर्शनास येत आहे. तेथील साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी चर काढून तात्पुरती उपाययोजना करण्यात आली आहे.

याशिवाय शहरातील खड्डे पडत असलेल्या ८८ मुख्य चौकांमध्ये काँक्रिटीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले असून त्यापैकी ६३ चौकांचे काम पूर्ण झाले आहे. वाहतूक पोलीस विभागाच्या परवानगीनंतर उर्वरित १० चौकांची कामे सुरू करण्यात येणार असून त्यांच्याच सूचनेनुसार १३ चौकांची कामे पावसाळी कालावधी लक्षात घेता सद्यस्थितीत थांबवण्यात आली आहे. सद्यस्थितीत ठाणे बेलापूर मार्ग, आम्र मार्ग, पामबीच मार्ग या मुख्य रस्त्यांवर काही प्रमाणात खड्डे दिसून येत असून ते दुरुस्त करण्याची कार्यवाही तत्परतेने करण्यात येत आहे. नवी मुंबई महापालिका पावसाळी कालावधीत रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत रहावी व नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये याकरीता दक्ष असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर स्वत: सर्व परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून नियमित आढावा घेत आहेत.

# नवी मुंबईत कमी दाबाने पाणीपुरवठा

## मोरबे धरणात मुबलक साठा असूनही तुटवडा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मोरबे धरण परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असताना तसेच मोरबे धरणात पाण्याचा पुरेसा साठा असूनदेखील, महापालिकेकडून कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा केला जात असल्याने, नागरिक मेटाकुटीला आलें आहेत. पाण्यासाठी त्यांना त्रास सहन करावा लागत असल्याने सीवूड्स विभागांतील नागरिकांना घेऊन पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांची भेट घेणार असल्याचे भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव यांनी सांगितले आहे.

पावसाने जुलै महिन्यांत जोर धरला आहे. मोठ्या प्रमाणावर पाऊस सुरू आहे. तसेच नवी मुंबई महापालिकेचे स्वतःच्या मालकीचे असलेले मोरबे धरण मध्ये मुबलक साठा उपलब्ध असताना, महापालिकेकडून कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात आहे. नवी मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सोसायट्या असल्याने कमी दाबाने पाणीपुरवठा असलेल्याने पाणी वरच्या बाजूला चढत नाही. सोसायटीतमधील घराची (युनिट) संख्या पाहता सरासरी पेक्षा निम्मर पाणीपुरवठा होत आहे.

टँकरने ही पाणीपुरवठा मिळणे कठीण झाले आहे. सीवुडस परिसरातील सोसायटीतील नागरिकाच्या तक्रारींची दखल घेत, सुमारे ५००सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांसह पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांची भेट घेऊन पुढील १०दिवस सीवुडस विभागांत होणाऱ्या पाणी पुरवठ्याचे मीटर लावुन रीडिंग व वापरण्यात आलेले पाण्याचे युनिट नोद घेण्याची विनंती करणार असल्याचे भरत जाधव यांनी सांगितले.

# रसायनीतील कामगारांचे थकीत वेतन द्यावे

## खासदार श्रीरंग बारणे यांची केंद्रीय रसायनमंत्र्यांकडे मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील हिल इंडिया लिमिटेड कंपनीमधील कामगारांचे मागील सहा महिन्यांपासूनचे वेतन थकले आहे. त्यामुळे कामगारांची उपासमार सुरू असून तत्काळ वेतन अदा करावे, अशी मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

केंद्रीय रसायन मंत्री मनसुख मांडवीया यांची खासदार बारणे यांनी कंपनीतील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह भेट घेतली. रावसाहेब पाटील, राजेंद्र पाटील, सतीश म्हसकर, स्वप्नील राऊत, शैलेश बर्वे, ज्ञानेश्वर जांभळे, मयुर पाटील, जयवंत मालसुरे, श्रीपाल यादव उपस्थित होते.



मागील काही महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नाही. सोयीसुविधा मिळत नाहीत. कामगारांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली आहे. कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन द्यावे, नोव्हेंबर २०२२पासून थकलेल्या आठ महिन्यांचे वेतन द्यावे, २८ महिन्यांचा ६२ कोटी रुपये भविष्य निर्वाह निधी देण्यात यावा, २०१७ पासून सीओडी लागू करावी, सुरक्षा कर्मचारी नियुक्त करावेत. कंपनी सुरळीत चालण्यासाठी पूर्णवेळ अध्यक्ष यांची नेमणूक करावी, मे २०२२ नंतर सेवानिवृत्त झालेल्या ६० कर्मचाऱ्यांची ग्रॅज्युटी द्यावी, कंपनी व्यवस्थित चालण्यासाठी केंद्र सरकारतर्फे ५०० कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य करावे, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली, कंपनी सुरू ठेवावी, कंपनी सुरु ठेवणे शक्य नसेल, तर स्वेच्छा निवृत्ती (व्हीआरएस) लागू करावी, कामगारांची थकीत सर्व देणी द्यावीत, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

याबाबत लवकरच बैठक घेतली जाईल. मार्ग काढला जाईल, कामगारांचे प्रश्न सोडविले जातील. कंपनी चालू ठेवण्यासाठी प्रयत्न केले जातील. ते शक्य झाले नाही तर स्वेच्छा निवृत्ती (व्हीआरएस) लागू केली जाईल. कामगारांना दिलासा दिला जाईल. त्यांची थकीत सर्व देणी दिली जातील, अशी ग्वाही मंत्री मांडवीया यांनी दिली.

# माझी वसुंधरा अभियान विभागीय कार्यशाळा उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

पर्यावरणातील बदल लक्षात घेता माझी वसुंधरा अभियान ४.० हा कार्यक्रम कोकण विभागात वेगाने राबवावा, प्रत्येक यंत्रणेने या अभियानात सक्रीय व्हावे, असे प्रतिपादन कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले.

माझी वसुंधरा अभियान ४.०च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व आझादी का अमृत महोत्सवांतर्गत मेरी माती मेरा देश अभियानाबाबत प्रशासकीय यंत्रणांना मार्गदशन देण्यासाठी जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त शुक्रवारी (दि. २८) कोकण विभागीय आयुक्त कार्यालय व पनवेल महापालिका यांच्या विद्यमाने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली विभागस्तरीय कार्यशाळा झाली. त्या वेळी ते बोलत होते.



या कार्यशाळेत पालघर जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, रायगड मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वास्टेवाड, पनवेल आयुक्त गणेश देशमुख, विभागीय वन अधिकारी ठाणे कांचन पवार, विभागीय वन अधिकारी रायगड स्वप्नील धुरे, पनवेल अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, उपआयुक्त (सामान्य प्रशासन) मनोज रानडे, उपआयुक्त (नगरपालिका प्रशासन) रविंद्र जाधव, उपआयुक्त (विकास) गिरीष भालेराव, कोंकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, जिल्हा नियोजन अधिकारी ठाणे गणेश जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) जि.प. ठाणे प्रमोद काळे तसेच कोंकण विभागातील सर्व विस्तार अधिकारी, सर्व गट विकास अधिकारी, उपस्थित होते. कार्यशाळेच्या प्रारंभी सर्व उपस्थितांनी इर्शाळवाडी दुर्घटनेतील मृतात्मे तसेच यासारख्या विविध दुर्घटनेतील मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली.

या कार्यशाळेस उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. कल्याणकर म्हणाले की, हा शासनाचा महत्त्वपूर्ण कार्यक्रम आहे. वातावरणात मोठ्याप्रमाणात बदल होत आहेत. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आपल्याला प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी मागील वर्षाचे काम किती झाले आहे त्याचा आढावा घेऊन या वर्षी माझी वसुंधराचे काम अधिक व्यापक होणे आवश्यक आहे. मेरी मिट्टी मेरा देशअभियान यशस्वी करण्यासाठी शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून, अभियान यशस्वी करावे. माझी वसुंधरा अभियानात कोकण विभागात शंभर टक्के नोंदणी झाल्या बद्दल आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी नागरी भागात माझी वसुंधरा अभियान राबविण्याबाबत विशेष मार्गदर्शन केले. देशमुख यांनी यावेळी 'स्वच्छ भारत' मिशनचे महत्व सांगितले. कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून या कार्यशाळेचे आयोजन झाले, त्याबद्दल देशमुख यांनी आयुक्त कल्याणकर यांचे आभार मानले. आयुक्त देशमुख यांनी माझी वसुंधरा अभियान यशस्वी करण्यासाठी उपस्थितांना सूचना केल्या.

आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत मेरी मिट्टी मेरा देश या अभियानाबाबत जिल्हा परिषद ठाण्याचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), प्रमोद काळे यांनी विशेष मार्गदर्शन केले. या वेळी काळे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी माझी वसुंधरा अभियानसंबधी दिलेल्या संदेशाचे वाचन केले. पर्यावरण पुरक गणेशात्सवबाबत जिल्हा नियोजन अधिकारी,ठाणे सुरेश जाधव यांनी विशेष मार्गदर्शन केले. श्री. जाधव यांनी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुरस्कार योजनेची प्रभावी अंमलबजावणी कशी करावी याबाबत सादरीकरणासह सविस्तर माहिती दिली.

कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी शासकीय यंत्रणांनी केलेल्या उल्लेखनीय कामांची प्रसिद्धी कशी करावी. शासकीय यंत्रणांनी केलेल्या कामाची दखल जनसामान्यांनी घेतली पाहिजे, त्यांचे कौतुक झाले पाहिजे यासाठी प्रसिद्धी माध्यमांचा कसा वापर करावा याबद्दल मार्गदर्शन केले. युनिसेफ महाराष्ट्र आणि विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्र, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्यातर्फे माझी वसुंधरा टूल किट मधील महत्वाचे मुद्दे उपस्थितांसमोर सादर केले.

विभागीय वन अधिकारी रायगड स्वप्निल धुरे यांनी माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत जिल्हयाच्या भौगोलिक स्थितीनुसार वृक्ष, रोपे,निवडीबाबत विस्तृत माहिती दिली, तसेच जीओ टॅग वृक्ष गणनाबाबत मार्गदर्शन केले.

# इर्शाळवाडी दुर्घटनेनंतर प्रशासन सतर्क

## रोह्यात तलाठी, ग्रामसेवक, कोतवाल, पोलीस पाटील यांच्याकडून दैनंदिन आढावा

**रोहे : प्रतिनिधी**

मुसळधार पावसात खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली. याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून रोहा तालुक्यातील प्रशासन अलर्ट मोडवर असून दरडप्रवण असलेल्या १६ गावांवर विशेष लक्ष ठेवून आहेत. या गावातील माहिती रोजच्या रोज तहसीलदार डॉ. किशोर देशमुख घेत असून सारेच प्रशासन इर्शाळवाडी दरड दुर्घटनेनंतर सतर्क झाल्याचे दिसून येते.


(छाया : महादेव सरसंबे)

भूशास्त्र सर्वेक्षण विभागाच्या (जीएसआय) सर्वेक्षणानुसार रोह्यामध्ये एकूण १६ गावे दरडप्रवण क्षेत्रात येतात. यामध्ये तिसे, वाळुंजवाडी, घोसाळे, अरे बुद्रुक, वांदोली, संभे, नडवली, वावेखार, पाले बुद्रुक, पडम, महादेववाडी, पाले खुर्द आदी गावांचा समावेश असून कवळठे, शेणवई, डोंगरी, मेढा, खारापटी ही गावेही संभाव्य धोका वर्गात मोडतात. तिसे व वाळुंजवाडी ही गावे वर्ग २ म्हणजेच धोकादायक वर्गवारीत आहेत. या पार्श्वभूमीवर तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांच्या निर्देशानुसार मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कोतवाल यांनी संबंधित गावांना भेट देऊन लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. स्वतः तहसीलदार डॉ. देशमुख व अपर तहसीलदार अप्पर तहसीलदार प्रकाश मेहेत्रे यांनी काही गावांना भेटी देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

२०२१च्या जीएसआय सर्वेक्षणानुसार रोहा तालुक्यातील तिसे गावात संरक्षण भिंत बांधण्याचे निर्देश देण्यात आले होते, तर वाळूंजवाडी येथील आठ कुटुंबाना आर्थिक मदत करून स्थलांतरित करण्यात आले होते. आता अजूनही २१ कुटुंबाचे स्थलांतर करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी खासगी जागा संपादन करण्याचा प्रस्ताव आहे, अशी माहिती महसूल विभागाकडून देण्यात आली.

सध्या तालुक्यातील मेढा, खरापटी, कवळठे, डोंगरी, शेणवई या गावांना संभाव्य धोका असल्याने या गावांमध्ये नियमित मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, कोतवाल, ग्रामसेवक लक्ष ठेवून आहेत. मेढा येथे संभाव्य धोका लक्षात घेता काही घरांतील लोक रात्री बाहेर झोपत आहेत. दरम्यान, तेथे आमदार अनिकेत तटकरे यांनी भेट देत पाहणी केली.

**रोहा तालुक्यात प्रशासन सतर्क असून दरडप्रवण गावांत पालक अधिकारी नेमण्यात आले आहेत. या क्षेत्रात शासनाच्या सर्व यंत्रणा सर्तक आहेत. आवश्यक असल्यास नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी प्रशासनाची टीम सज्ज आहे. शाळा व मंदिर येथे पर्यायी व्यवस्था करण्याची तयारी केलेली आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये वा अफवा पसरवू नये.**
**-डॉ. किशोर देशमुख, तहसीलदार, रोहा**

# महाडमध्ये शेतकरी मेळावा उत्साहात

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात पीएम किसान योजनेचे पैसे जमा झाले. दरम्यान नाते येथील शेतकरी मेळाव्याला भाजपचे बिपीन महामुणकर यांनी सरकारी योजनांचा लाभ घेऊन उत्कृष्ट शेती करण्याचा सल्ला दिला.

देशाचे लाडके आणि लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब शेतकऱ्यांसाठी पीएम किसान पेन्शन योजना सुरू केली होती. या योजनेचा १४वा हप्ता गुरुवारी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला. याचबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील राज्य सरकारचे वतिने वर्षाला सहा हजार जमा करण्याचा निर्णय घेतला होता. त्या अनुषंगाने केंद्राचे दोन व राज्याचे दोन असे चार हजार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले. याबाबत माहिती व जनजागृती करण्यासाठी महाड कृषी विभाग आणि भाजप महाड वतीने मौजे नाते या गावात शेतकरी मेळावा घेण्यात आला.

या मेळाव्याला भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, तालुका कृषी अधिकारी बी. पी. कदम, संदिप ठोबरे, सरचिटणीस महेश शिंदे, उपतालुकाध्यक्ष चंद्रजित पालांडे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, शेतकरी मोर्चा चे किशोर जामदार, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक, ग्रामसेवक सह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी प्रोजेक्टवर शेतकऱ्यांना या योजनेची व शेतीची माहिती देण्यात आली, तर बिपीन महामुणकर यांनी कोकणात शेतीचे यात्रिंकीकरण करण्यात महाडचा प्रथम क्रमांक असल्याने महाड तालुका कृषी अधिकारी व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले. योजनांचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनी अधिकाधिक चांगली शेती करून भरघोस उत्पन्न घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.


(छाया : महेश शिंदे)

# हरवलेले मोबाईल, दागिने मिळवून दिले परत

## माणगाव पोलिसांची तत्पर कामगिरी

**माणगाव : प्रतिनिधी**

सध्याचे युगात मोबाईल वापर करणाऱ्यांची संख्या वाढली असून मोबाईल हे दैनंदिन वापरातील महत्त्वाचे उपकरण आहे. माणगाव पोलिसांनी दमदार कामगिरी करीत हरवलेले मोबाईल परत मिळवून दिले आहेत.

माणगाव पोलीस ठाणे अंतर्गत मोबाईल हरविल्याच्या तक्रारी दाखल होत्या. पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील व पोलीस तपास पथकाने गहाळ झालेले १३ मोबाईल शोधून संबंधितांच्या ताब्यात दिले आहेत. त्याचप्रमाणे रवाळजे येथून चोरीला गेलेले दागिनेसुद्धा माणगाव पोलिसांनी तपास करून संबंधित मालकाला परत केले आहेत.


(छाया : सलीम शेख)

या वेळी उपविभागीय अधिकारी नितीनकुमार पोंदकुळे, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, सहाय्यक निरीक्षक सतिश आस्वर, उपनिरीक्षक किर्तीकुमार गायकवाड, फौजदार सूर्यकांत भोजकर, शिपाई राम डोईफोडे, नाथा दहिफळे, रावसाहेब कोळेकर, पोंदे, रेश्मा वजरकर, प्रीती ओमले, मुंडे आदी उपस्थित होते.

# मोतिबिंदू शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांनी खालापूर तालुका व रसायनी परिसर मोतिबिंदमुक्त करण्याचा संकल्प केला असून दर महिन्याला एक शिबिर आयोजित करणार आहेत.

यामध्ये रुग्णाचे राहणे, येणे-जाणे, जेवण मोतिबिंदू शत्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. त्यासाठी रुग्णाचे आधार कार्ड व रेशन कार्डची आवश्यकता राहणार आहे. ३१ जुलै रोजी मोहोपाडा दत्त मंदिर, बाजारपेठ येथे खालापूर तालुका पत्रकार संघासोबत शिबिर घेण्यात येत असून दुसरे शिबिर २८ ऑगस्ट सिद्धेश्वरी कॉर्नर येथे आयोजित करण्यात आले आहे. याचा संबंधित रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण जाधव आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलने केले आहे.

# आंबेवाडी गावाचे पुनर्वसन करण्याची ग्रामस्थांची मागणी

**नेरळ : प्रतिनिधी**

प्रशासनाने आमचे गाव दरडग्रस्त घोषित केले आहेच, तर आमच्या गावाला भिंतीचे संरक्षण द्यावे; नाहीतर आमचे पुनर्वसन करावे, अशी मागणी आंबेवाडी ग्रामस्थांनी केली आहे. आमची आदिवासी ठाकूर समाजाची पाच एकर जागा आहे त्यावरील अतिक्रमण हटवून तेथे कायमचे पुनर्वसन करावे, म्हणून ग्रामस्थांची मागणी होत आहे.

कर्जत तालुक्यातील आंबेवाडी गाव धोकादायक म्हणून प्रशासनाकडून सांगण्यात आले. हे गाव माथेरानच्या डोंगर पायथ्याशी वसलेले गाव असून प्रशासनाकडून ऑनलाईन सर्वेक्षणात केलेल्या सर्वेक्षणात दरडग्रस्त गाव म्हणून धोकादायक सांगण्यात आले. या गावातील ४२ कुटुंबे जि.प. शाळेत स्थलांतरित झाली आहेत. आमच्या गावाच्या बाजूला असणाऱ्या नदीच्या येथे भिंत बांधून द्यावी; नाहीतर आमचे नेरळ शहरात असलेल्या कर्जत-कल्याण राज्यमार्गावरील मोहाचीवाडी येथील पाच ते सहा एकर राखीव जागेवरील अतिक्रमण हटवून पुनर्वसन करावे म्हणून येथील रहिवासी असलेले तथा नेरळ ग्रामपंचायत सदस्य नितीन निरगुडा यांनी ग्रामस्थांच्या वतीने मागणी केली आहे.

# विभागीय आयुक्तांकडून महाड येथे पाहणी

## आपत्तीग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना

**महाड : रामप्रहर वृत्त**

नदीतील गाळ उपशामुळे काही प्रमाणात पुराचा धोका कमी झाल्याचे निर्दर्शनास आले असल्याने सावित्री नदी व उपनद्यांचा १०० टक्के गाळमुक्त करा. आपत्ती ठिकाणच्या पुनर्वसनासाठी प्रस्ताव सादर करा, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दिल्या.

महाड येथे विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने आढावा बैठक घेण्यात आली. या वेळी आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, महाड उपविभागीय अधिकारी डॉ. ज्ञानोबा बानापुरे, तहसीलदार महेश शितोळे, मुख्याधिकारी महादेव रोडगे उपस्थित होते.



कोलाड कार्यकारी अभियंता यांच्या यंत्रणेमार्फत सावित्री नदी व इतर उपनद्यांतील १५८९६३७.०८ घ.मी. गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे या मान्सून कालावधीत जास्त पाऊस होऊनही धोका पातळी कमी झाली असून मोठ्या प्रमाणात पूरपरिस्थिती उद्भभवली नाही, असे अधिकारीवर्गातून सांगण्यात आले. नगर परिषदेच्या बैठकीनंतर डॉ. कल्याणकर यांनी मौजे तळीये येथील पुनर्वसन ठिकाणी भेट देऊन दरडग्रस्तांसाठी तयार करण्यात आलेली ६६ घरांची पाहणी केली. या घरांची दुरुस्ती १५ ऑगस्टपर्यंत सुस्थितीत करण्याच्या सूचना देत रायगड जिल्हा परिषदेने मोहोत (भिसेवाडी-सुतारवाडी) येथे स्थलांतरीत करण्यात आलेल्या कुटुंबीयांची भेट घेऊन चर्चा केली. तसेच येथील कुटुंबीयांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी दिले.

# पावसाचा जोर ओसरला

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेले अनेक दिवस मुसळधार पडणाऱ्या पावसाचा जोर आता कमी झाला आहे. त्यामुळे नागरिकांना सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

गेल्या आठवड्यापासून जोरदार पाऊस पडत होता. यामुळे सर्व नद्या, नाले, ओढे दुथडी भरून वाहू लागले. अनेक नद्यांनी धोक्याचीही पातळी ओलांडली. त्यामुळे नदीकाठच्या भागांमध्ये पुराचे पाणी शिरले होते. परिणामी नागरिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीचा फटका शेतीलाही बसला. शेतीत पाणी शिरून कामे ठप्प झाली आहेत. अखेर सलग सुमारे दोन आठवडे बरसल्यानंतर वरुणराजाचा जोर शुक्रवारपासून काहीसा ओसरला आहे. दरम्यान, अधूनमधून पावसाच्या सरी पडत आहेत.

# कर्जतमध्ये कार्यालयावर झाड कोसळले

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील दहीवली येथे असलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाचे कार्यालय असलेल्या इमारतीवर झाड कोसळले. त्यामुळे तेथील उप अभियंता कार्यालयात पाण्याची गळती सुरू झाली असून पाणी गळती रोखण्यासाठी नवीन पत्रे छपरावर टाकावी लागणार आहेत.


(छाया : विजय मांडे)

दहिवली गावात श्रीराम पुलाजवळ जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग कार्यालय आहे. २५ वर्षापासून तेथे लघु पाटबंधारे विभागाचे कार्यालय असून त्या इमारतीच्या बाजूला अनेक जुनी झाडे असून त्यातील एक झाड गुरुवारी (दि. २७) कार्यालयाच्या इमारतीवर कोसळले. जुने झाड असल्याने त्या झाडाच्या फांद्या या लघुपाटबंधारे विभागाच्या कार्यालयावर कोसळले आणि त्यात कार्यालयाच्या छापरावरील सिमेंट पत्रे यांचे मोठे नुकसान झाले. त्याचा परिणाम कार्यालयात पावसाच्या पाण्याची गळती सुरू झाली असून या पाण्यामुळे उप अभियंता यांच्या केबिलला डबक्याचे स्वरूप आले आहे. त्यामुळे कार्यालयातील किमती वस्तूंचे नुकसान होत असून केबिनमध्ये सुरू असलेले पाणी साठवण्यासाठी प्लास्टिक बादल्या खरेदी करण्यात आल्या आहेत.

दुसरीकडे पाऊस थांबत नसल्याने प्रभारी उपअभियंता सुजित धनगर यांना कार्यालयाच्या छप्परावर तात्पुरती उपाययोजना करणे देखील कठीण झाले आहे. नुकसानीची पाहणी कर्जत पंचायत समितीचे प्रशासक आणि गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी करून घेतले. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या गळती बद्दल सूचित केले असून तत्काळ उपाययोजना कराव्या लागणार असल्याने मान्यता देण्यात यावी अशी सूचना केली आहे.

# अळूची पाने बाजारात उपलब्ध

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळी हंगाम व त्यात अधिक श्रावण महिना सुरू आहे. या हंगामात काही खास हिरव्या पालेभाज्यांची उपलब्धता असते. त्यात अळूच्या पानांना विशेष मागणी असते. त्यातही काळी देठं असलेल्या काळसर हिरव्या देशी अळूच्या पानांना ग्राहकांची खासकरून गृहिणींनीची विशेष पसंती दिसून येते. अळूच्या पानांच्या वड्या हा नियमित खाद्यपदार्थ असला तरी सुगरणी महिला या पानांपासून अनेक प्रकारचे चवीचे पदार्थ बनवितात.



खोपोली भाजी मंडई व फेरीवाला बाजारात मागील आठ-दहा दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अळूची पाने उपलब्ध होत आहेत. या दिवसांत पुणे व नाशिक जिल्ह्यात अळूच्या पानांची शेती होत असते. या भागातून ही मोठ्या प्रमाणावर देशी अळूची पाने विक्रीसाठी खोपोली बाजारात उपलब्ध होत आहेत. यासोबत खास पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या अन्य देशी पालेभाज्या, रानभाज्याही खोपोलीत उपलब्ध आहेत.

अधिक श्रावण महिन्यात जेवणातील खास पदार्थ असल्याने तसेच पौष्टिक व चविष्ट असणाऱ्या आणि विविध प्रकारचे खाद्यपदार्थ बनत असल्याने नागरिकांकडूनही देशी अळूच्या पानांना मागणी केली जात आहे. ३० ते ४० रुपयांना दहा पानांची जुडी किंवा २० रुपयांना पाच पाने बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

डॉक्टरांच्या मते अळूमध्ये असलेले मॅग्नेशियम आपली स्नायू आणि हाडे मजबूत करते. अळूच्या पानांमध्ये व्हिटॅमिन सी असते, ज्यामुळे तुमची प्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते तसेच अँटी-ऑक्सिडेंट म्हणूनही कार्य करते, कर्करोग व हृदयरोगाच्या वाढीस प्रतिबंध करते.

# मध्य रेल्वेला भंगारातून चांगली कमाई

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने एप्रिल २०२२ ते जून २०२३ या कालावधीत १३८ मेल/एक्स्प्रेस डबे स्क्रॅप केले आणि भंगार विक्रीसाठी पाठवले, ज्यामुळे प्रति कोच सरासरी १२.७३ लाख कमाईसह १७.५८ कोटी उत्पन्न झाले आहे.

मध्य रेल्वेने १३८ डबे एप्रिल २०२२ ते जून २०२३ या २५ वर्षांच्या कोडल लाइफनंतर बंद केले आहेत. सुरक्षिततेची खात्री करून आणि रेल्वेच्या धोरणाचे पालन करून आणि कुर्ला कोच धिक्कार यार्ड येथे तुटल्यानंतर त्यांना लिलावासाठी स्क्रॅप यार्डमध्ये पाठवले आहे.



गेले आर्थिक वर्ष २०२२-२३मध्ये १४ एसी डब्यांसह एकूण ७९ डबे पाडण्यात आले. या ७९ डब्यांच्या विक्रीतून ११.७१ कोटींची कमाई झाली आहे. गेल्या तीन महिन्यांत म्हणजे एप्रिल ते जून या कालावधीत एकूण ५९ डब्यांचे स्क्रॅप करण्यात आले. त्यापैकी ११ एसी डबे होते, ज्यामुळे ५.८७ कोटींची कमाई झाली आहे.

मुंबई विभागात यशस्वी लिलाव प्रक्रियेनंतर खराब झालेले डबे कुर्ला येथील कोच कंडेम्नेशन यार्डमध्ये आणले जातात. त्यावर काम करणाऱ्या २० ते २५ कर्मचाऱ्यांनी गॅस कटरने त्यांचे तुकडे केले. सीएसएमटी, दादर, वाडीबंदर, एलटीटी कोचिंग यार्डमधून हे डबे आणले जातात. या डब्यांच्या भंगार विक्रीतून महसूल मिळतो.

याच कालावधीत म्हणजेच एप्रिल २०२२-जून २०२३दरम्यान मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने १९३ नवीन डबे खरेदी केले आहेत, ज्यात ३९ स्लीपर क्लास डबे, ५७ थर्ड एसी, २४ सेकंड एसी, आठ फर्स्ट एसी, २९ जनरल सेकंड क्लास, पाच पँट्री कार, १९ पँट्री कार्स आणि गुआर्ड ब्रेक व्हॅनचा समावेश आहे.

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील सक्रिय रोलिंग स्टॉक सध्या विविध गाड्यांमध्ये वापरले जाणारे एकूण २२७८ कोच आहेत, ज्यात ८३५ वातानुकूलित डबे, ७२५ स्लीपर कोच, ५२५ जनरल डबे, ६० पँट्री कार, सहा विस्टाडोम डबे, ४८ डबे व ७९ भाडे व इतर डबे यांचा समावेश आहे.

# ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे होणार पुनरागमन?

**लॉस एंजेलिस : वृत्तसंस्था**

लॉस एंजेलिस येथे २०२८मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत जंटलमन्स गेम अशी ओळख असणाऱ्या क्रिकेटचा समावेश होणार आहे. 'द गार्डियन'मधील वृत्तानुसार पुरुष आणि महिला संघ टी-२० क्रिकेट स्पर्धा ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकण्यासाठी पात्र ठरतील. क्रिकेट या खेळाचा तब्बल १२८ वर्षांनी ऑलिम्पिकमध्ये समावेश होणार आहे.




क्रिकेट हा खेळ ऑलिम्पिकमध्ये यापूर्वी खेळला गेला आहे. १९००मध्ये क्रिकेटला या खेळांच्या महाकुंभात स्थान मिळाले होते. आता १२८ वर्षांनंतर ते पुन्हा ऑलिम्पिकमध्ये परत येऊ शकते. २०२८मध्ये लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये क्रिकेट या खेळाचा समावेश होणार आहे. ऑलिम्पिकमध्ये क्रिकेट हे टी-२० फॉर्मेटमध्ये खेळले जाईल. १९००मध्ये प्रथम श्रेणी क्रिकेटच्या आधारावर त्याचे आयोजन करण्यात आले होते. आता २०२८व्यतिरिक्त क्रिकेटला २०२३च्या ब्रिस्बेन ऑलिम्पिकमध्येही स्थान मिळण्याची शक्यता आहे. प्रसारण हक्कातून मिळणारे उत्पन्न हे त्यामागचे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जाते.

यापूर्वी २०२२मध्ये बर्मिंगहॅम येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिला क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता, तेव्हापासून ऑलिम्पिकमध्ये त्याच्या समावेश करण्याची चर्चा सुरू आहे. 'द गार्डियन'च्या वृत्तानुसार, महिला आणि पुरुष क्रिकेटला २०२८च्या लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळू शकते. टी-२० फॉरमॅटच्या आधारे त्याचे आयोजन केले जाईल, मात्र दोन्ही गटांत केवळ प्रत्येकी संघांनाच संधी दिली जाईल. आयसीसी क्रमवारीच्या आधारे संघ ठरवले जाऊ शकतात.

पॅरिसमध्ये २०२४ ऑलिम्पिकसाठी भारतातील प्रसारण हक्क सुमारे १६५ कोटी रुपयांना विकले गेले आहेत. २०२८ आणि २०२३च्या ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचा समावेश केल्यास ब्रॉडकास्टरला हक्कातून सुमारे १६०० कोटी रुपये मिळू शकतात. म्हणजेच १० पट अधिक नफा वाढ होण्याची शक्यता आहे. यासाठी सर्वच जण उत्सुक आहेत.

१९००मध्ये ऑलिम्पिकमधील क्रिकेटबद्दल जर बोलायचे झाले, तर बेल्जियम, फ्रान्स, ब्रिटन आणि नेदरलँड्स ऑलिम्पिकमध्ये प्रवेश करणार होते, पण बेल्जियम आणि नेदरलँड्सने माघार घेतली. यानंतर सुवर्ण आणि रौप्यपदकांचा निर्णय फक्त दोन संघांमधील सामन्याने झाला. यात फ्रान्सला नमवून ब्रिटनने ऑलिम्पिकमधील एकमेव सुवर्णपदक जिंकले.

### नऊ खेळांचा समावेश

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटसह नऊ खेळांना २०२८च्या ऑलिम्पिकमध्ये समावेश करण्यासाठी निवडण्यात आले आहे. क्रिकेटव्यतिरिक्त यात बेसबॉल/सॉफ्टबॉल, फ्लॅग फुटबॉल, लॅक्रोस, ब्रेक डान्सिंग, कराटे, किक बॉक्सिंग, स्क्वॅश आणि मोटरस्पोर्ट्सचा समावेश आहे. या वर्षाच्या अखेरीस क्रिकेटबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो.

# जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्यची उपांत्य फेरीत धडक

**टोकियो : वृत्तसंस्था**

भारताच्या लक्ष्य सेनने जपानच्या कोकी वातानाबेला सरळ गेममध्ये नमवत जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या (सुपर ७५० दर्जा) उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. २०२१च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील कांस्यपदक विजेता आणि जागतिक क्रमवारीत १३व्या स्थानी असणाऱ्या लक्ष्यने वातानाबेला २१-१५, २१-१९ असे नमवले. दुसरीकडे एचएस प्रणॉयला झुंजार खेळानंतरही पराभवाचा सामना करावा लागला.

जागतिक क्रमवारीत दहाव्या स्थानी असणाऱ्या प्रणॉयने अग्रमानांकित डेन्मार्कच्या व्हिक्टर ॲक्सेलसेनकडून २१-१९, १८-२१, ८-२१ अशी हार पत्करली, तर सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी व चिराग शेट्टी जोडीची सलग १२ विजयांची मालिका खंडित झाली. त्यांना चायनीज तैपेइच्या ली यांग व वांग ची लान जोडीकडून १५-२१, २५-२३, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. लक्ष्यचा सामना पुढच्या फेरीत इंडोनेशियाच्या पाचव्या मानांकित जॉनथन क्रिस्टीशी होणार आहे.




**युवा खेळाडू**

भारताचा लक्ष्य सेन हा २१ वर्षीय युवा खेळाडू असून सध्या चांगल्या फॉर्ममध्ये दिसत आहे. त्याची कामगिरी अशीच राहिली, तर भारताला या स्पर्धेत पदक मिळण्याची आशा आहे.

# आयसीसी कसोटी क्रमवारीत रोहित शर्मा 'टॉप टेन'मध्ये

## यशस्वीची मोठी झेप

**दुबई : वृत्तसंस्था**

भारताचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वालने ताज्या आयसीसी कसोटी क्रमवारीत मोठी कामगिरी केली आहे. तो ११ स्थानांची मोठी झेप घेत ६३व्या स्थानावर आला आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्मालाही वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेत चांगल्या कामगिरीचा फायदा झाला असून तो नवव्या स्थानावर पोहचला आहे.

२१ वर्षीय जैस्वालनेने पोर्ट ऑफ स्पेन येथे वेस्ट इंडिजविरुद्ध अनिर्णित राहिलेल्या दुसऱ्या कसोटीत ५७ आणि ३८ धावा केल्या. यामुळे त्याला आता ४६६ गुण मिळाले आहेत. दुसऱ्या कसोटीत ८० आणि ५७ धावा करणारा रोहित हा भारतीय कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत सर्वोच्च स्थानी आहे. त्याचे ७५९ गुण आहेत आणि तो श्रीलंकेच्या दिमुथ करुणारत्नेबरोबर नवव्या स्थानी आहे.



कसोटी क्रमवारीत रोहितनंतर ऋषभ पंत आहे. त्याचे ७४३ गुण असून एका स्थानाच्या नुकसानासह तो १२व्या स्थानावर आहे. विराट कोहली ७३३ गुणांसह १४व्या स्थानावर कायम आहे. ॲशेसमध्ये चांगली कामगिरी करणारा ऑस्ट्रेलियाचा मार्नस लाबुशेन आणि इंग्लंडचा जो रूट यांनी प्रत्येकी तीन स्थानांनी प्रगती करीत अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर पोहचले आहेत. न्यूझीलंडचा फलंदाज केन विल्यमसन ८८३ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

**गोलंदाजांमध्ये अश्विन, अष्टपैलूंमध्ये जडेजा अव्वल**

भारताचा अनुभवी फिरकीपटू रविचंद्रन अश्विन (८७९) गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानावर आहे, तर रवींद्र जडेजा (७८२) सहाव्या स्थानावर आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजनेही क्रमवारीत प्रगती केली असून सहा स्थानांनी प्रगती करीत ३३व्या स्थानावर आला आहे. श्रीलंकेच्या प्रभात जयसूर्याने गॅलेमध्ये सात विकेट्स घेत सात स्थानांनी प्रगती करीत सातव्या क्रमांकावर पोहचला आहे. अष्टपैलूंच्या क्रमवारीत रवींद्र जडेजा आणि आर. अश्विन यांनी अनुक्रमे आपले अव्वल दोन स्थान कायम राखले आहेत, तर अक्षर पटेल पाचव्या क्रमांकावर कायम आहे.



# स्टुअर्ट ब्रॉडने 'ॲशेस'मध्ये गाठला मोठा टप्पा!

## १५० विकेट घेणारा इंग्लंडचा पहिला गोलंदाज

**लंडन : वृत्तसंस्था**

ॲशेस मालिकेतील पाचव्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यात दुसऱ्या दिवशी इंग्लंडच्या स्टुअर्ट ब्रॉडने इतिहास रचला. ॲशेसमध्ये १५० विकेट्स घेणारा तो इंग्लंडचा पहिला गोलंदाज ठरला, तर यामध्ये त्याने सर्वाधिक विकेट्स घेण्याच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर मजल मारली आहे.

ॲशेसमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम शेन वार्नच्या नावावर आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू वॉर्नने ७२ डावांत १९५ विकेट घेतल्या आहेत. या बाबतीत मॅकग्रा दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याच्या नावावर ६० डावांत १५७ विकेट आहेत. यामध्ये १५० किंवा त्याहून अधिक विकेट घेणारा स्टुअर्ट ब्रॉड इंग्लंडचा पहिला गोलंदाज ठरला आहे. या दरम्यान त्याची एका डावातील सर्वोत्तम कामगिरी १५ धावांत आठ विकेट्स आहे.

# युसूफ पठाणचे टी-१० लीगमध्ये वादळी अर्धशतक

## अवघ्या २६ चेंडूंत चोपल्या ८० धावा

**हरारे : वृत्तसंस्था**

टीम इंडियातून निवृत्त झालेल्या युसूफ पठाणने झिम्बाब्वेमध्ये खेळल्या जाणाऱ्या झिम आफ्रो टी-१० लीग स्पर्धेत झंझावाती खेळीच्या जोरावर आपल्या संघाला सहा विकेट्सने विजय मिळवून दिला. जोहान्सबर्ग बफेलोज संघाकडून खेळताना युसूफने डर्बन कलंदर संघाविरुद्ध तडाखेबंद फलंदाजी करताना २६ चेंडूंत ८० धावा कुटल्या.

प्रथम फलंदाजी करताना डर्बन कलंदर्सने १० षटकांत चार गडी गमावून १४१ धावांचे डोंगरासारखे लक्ष्य ठेवले होते. संघाकडून आंद्रे फ्लेचरने १४ चेंडूंत ३९ धावांची तुफानी खेळी खेळली. याशिवाय आसिफ अलीने १२ चेंडूंत ३२ धावांचे योगदान दिले, तर शेवटी निक वेल्चने नऊ चेंडूंत २४ धावा करीत संघाला १४०पर्यंत पोहचवले.



१४१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना जोहान्सबर्ग बफेलोज संघाने दुसऱ्या षटकातच पहिली विकेट गमावली. हाफिज आठ चेंडूंत १७ धावा करून बाद झाला. त्याच्यापाठोपाठ टॉम बँटन चार धावा करून परतला. त्यानंतर विल समीदही १६ धावा करून बाद झाला. येथून हा संघ सामन्यातून बाहेर पडला असे वाटत होते, मात्र चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या युसूफ पठाणने २६ चेंडूंत ८० धावा फटकावत सामना पलटवला आणि आपल्या संघाला रोमहर्षक विजय मिळवून दिला.

**चौकार-षटकारांचा पाऊस**

युसूफ पठाणने संघाला विजय मिळवून देण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेताना आपल्या खेळीत चार चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने ८० धावांची स्फोटक खेळी खेळली. त्याने मैदानाच्या चारी बाजूला जोरदार फटकेबाजी केली. शेवटच्या षटकात विजयासाठी २० धावा हव्या होत्या. या षटकात पठाणने दोन षटकार आणि दोन चौकार मारून संघाला विजय मिळवून दिला.

# आशियाई क्रीडा स्पर्धा : टीम इंडियाच्या पुरुष आणि महिला क्रिकेट संघांना थेट उपांत्यपूर्व फेरीत एन्ट्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये महिला संघांसह पुरुष संघदेखील क्रिकेट सामने खेळणार आहेत. एका अहवालानुसार भारताच्या पुरुष आणि महिला क्रिकेट संघाला आयसीसी टी-२० क्रमवारीच्या आधारे थेट उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळाले आहे.

आयसीसी टी-२० क्रमवारीत १ जूनपर्यंत असलेल्या आशियातील अव्वल चार क्रिकेट संघांना थेट उपांत्यपूर्व फेरीत स्थान देण्यात आले आहे, ज्यामध्ये भारत, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश या संघांचा समावेश आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत एकूण १८ संघ पुरुष क्रिकेट स्पर्धेत आणि १४ संघ महिला क्रिकेट स्पर्धेत भाग घेतील. भारतीय पुरुष संघाचा उपांत्यपूर्व सामना ५ ऑक्टोबर रोजी होईल, त्याच्या दुसऱ्याच दिवशी उपांत्य फेरीचा सामना होईल.

१९ ते २६ सप्टेंबर दरम्यान महिला क्रिकेटचे सामने खेळले जाणार आहेत, ज्यामध्ये हरमनप्रीत कौरला दोन सामन्यांच्या बंदीमुळे दोन्ही बाद फेरीचे सामने खेळता येणार नाहीत. २२ सप्टेंबर रोजी भारतीय महिला उपांत्यपूर्व फेरीत भिडतील. जर ते उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले, तर हा सामना २५ सप्टेंबरला होईल. २६ सप्टेंबर रोजी सुवर्ण आणि कांस्यपदकांचे सामने होणार आहेत.



### असे आहेत संघ

**पुरुष संघ** : ऋतुराज गायकवाड (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, राहुल त्रिपाठी, तिलक वर्मा, रिंकू सिंग, जितेश शर्मा, वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद, रवी बिश्नोई, आवेश खान, अर्शदीप सिंग, मुकेश कुमार, शिवम मावी, शिवम दुबे आणि प्रभसिमरन सिंग.

**महिला संघ** : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना, शफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा, ऋचा घोष, अमनजोत कौर, देविका वैद्य, अंजली सरवानी, तितस साधू, राजेश्वरी गायकवाड, मिन्नू मणी, कनिका आहुजा, उमा छेत्री, आणि अनुषा बरेड्डी.

जीवेत् शरद: शतम्!



**राजू झांबरे**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

प्रशांत खानावकर, समीर कटेकर

॥ भावपुर्ण श्रध्दांजली ॥



**स्व. लक्ष्मण गोवर ठाकूर**

मृत्यु :- मिती अधिक श्रावण शु. ४, शके १९४५, शुक्रवार दि. २१/०७/२०२३ रोजी

**दशक्रिया विधी**

रविवार दि. ३०/०७/२०२३ रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे

**उत्तरकार्य विधी**

मंगळवार दि. ०१/०८/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता (राहत्याघरी)

| दिनांक | कार्यक्रम |
|---|---|
| ३०/०७/२०२३ (रविवार) | दशक्रिया विधी |
| ३१/०७/२०२३ (सोमवार) सायं. ७ ते ९ | विश्वनाथ बुवा संगीत विद्यालय दिघोडे प्रस्तुत 'भक्तीधारा', गुरुवर्य :- श्री.सुहास ठाकूर सर (धुतूम), गायक :- मृणाली ठाकुर, संचाली पाटील, प्रगती डाकी, प्रियांशी डाकी, पुजा म्हात्रे, पखवाजः- आयुष म्हात्रे, तबला :- विनित ठाकूर, |
| ०१/०८/२०२३ (मंगळवार) सायं. ७ ते ९ | श्री गुरुकृपा भजन मंडळ, कोपर, बुवा -सौ. सुप्रिया समीर घरत, पखवाज-श्री. तुषार घरत, तबला -कु. मिलींद कडू, टाळ -कु. उमेश गावंड. |

शोकाकुल

**समस्त ठाकूर परिवार**

पत्ता: मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com